- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, ३ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २६४ | किंमत : २ रूपये

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५२,३४० /-
- २३ कॅरेट : १,५१,७५० /-
- चांदी : २,३८,३००/-

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# आजपासूनच हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र वाटप

## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या आधी मराठ्यांचे सर्व प्रश्न सोडवणार, प्रसाद लाड यांचा जरांगेंना शब्द

**वृत्तसंस्था, मुंबई**

मराठा समाजाच्या सर्व मागण्या या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या म्हणजे १७ सप्टेंबरच्या आधी पूर्ण करू, मराठ्यांना ओबीसींच्या सर्व सवलती देऊ, असा मोठा शब्द राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे यांना दिला. आजपासून (३ सप्टेंबर) हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्राचं वाटप सुरू होईल, असंही ते म्हणाले. मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घ्यावं, उद्याच सगळे मंत्री घेऊन आंतरवली सराटीमध्ये येतो, असंही लाड म्हणाले.

अंतरवाली सराटी येथे गेल्या पाच दिवसांपासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू आहे. हे आंदोलन सोडवण्यासाठी आणि आरक्षणाच्या मुद्द्यावर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी राज्य सरकारचे प्रतिनिधी म्हणून आमदार प्रसाद लाड यांनी अंतरवाली सराटी गाठून मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली.

यावेळी प्रसाद लाड यांनी मराठा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांवर सरकारच्या वतीने सकारात्मक आश्वासन दिले असून, मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या आधी सर्व प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल, असा शब्द जरांगेंना दिला.



दरम्यान, प्रसाद लाड यांनी दिलेल्या आश्वासनानंतर मनोज जरांगे पाणी प्यायले. परंतु, राज्य सरकारने आणखी चार दिवस घ्यावेत आणि मराठ्यांच्या सगळ्या मागण्या मान्य कराव्यात असं जरांगे म्हणाले. आता जरी पाणी प्यायलो असलो तरी सगळ्या मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण सोडणार नाही, असं मनोज जरांगे म्हणाले.

**आमदार प्रसाद लाड यांनी दिलेली प्रमुख आश्वासने**

हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र वाटपः उद्या दुपारी १२ वाजल्यापासून हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्र वाटपाची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू करण्यात येईल.

विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांचा प्रश्नः ज्या चार विद्यार्थ्यांची कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली होती, त्याप्रकरणी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना देण्यात आल्या असून विद्यार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**आंदोलनावरील गुन्हे मागे घेणे**

मराठा आरक्षणाच्या लढ्यादरम्यान दाखल झालेल्या एकूण १३७६ गुन्ह्यांपैकी बहुतांश गुन्हे मागे घेण्यात आले असून उर्वरित राहिलेले गुन्हे तांत्रिक व कायदेशीर चौकटीत कसे मागे घेता येतील, याची पडताळणी सुरू आहे.

**मराठा आरक्षणासाठी स्वतंत्र कार्यालय**

गेल्या आठवड्यात झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार, मराठा आरक्षणाच्या समितीसाठी १२५० स्क्वेअर फुटाचे स्वतंत्र कार्यालय उपलब्ध करून दिले जात आहे.

**मंत्रालयाशी थेट समन्वय**

मराठा समाजाला यापूर्वी आपल्या न्याय्य हक्कांसाठी केवळ सामाजिक न्याय विभागावर अवलंबून राहावे लागत होते. यापुढे थेट मंत्रालयाशी समन्वय साधून मराठ्यांचे सर्व प्रश्न वेगाने सोडवले जातील.

**शिंदे समितीला मुदतवाढ**

जात पडताळणी समिती आणि वंशावळी शोधणाऱ्या न्यायमूर्ती शिंदे समितीला पुन्हा एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येणार आहे. तसेच या समितीच्या कामकाजासाठी मुंबईत ३ हजार स्क्वेअर फुटांची जागा दिली जाईल.

**ओबीसींनुसार सर्व सवलती लागू**

इतर मागासवर्गीय समाजाला मिळणाऱ्या सर्व शैक्षणिक व आर्थिक सवलती मराठा समाजालाही पूर्णपणे लागू करण्यात येतील.

**विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत**

आरक्षणाचा अंतिम निर्णय लागत नाही, तोपर्यंत कोणत्याही मराठा विद्यार्थ्याचा शैक्षणिक प्रवेश रद्द केला जाणार नाही. तसेच त्यांच्या शैक्षणिक शुल्काचा (फी) भार राज्य सरकार उचलणार आहे.

**अण्णासाहेब महामंडळाला अतिरिक्त निधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळासाठी उर्वरित ३०० कोटी रुपयांचा निधी तात्काळ वितरित केला जात असून, यापुढे या महामंडळाला कोणत्याही प्रकारची आर्थिक कमतरता भासू दिली जाणार नाही.

---

थोडक्यात

## जितेंद्र मिश्रा राम मंदिर ट्रस्टचे पहिले सीईओ

**अयोध्या :** प्रभू श्री रामजन्मभूमी मंदिर ट्रस्टच्या सीईओपदी जितेंद्र मिश्रा यांची निवड करण्यात आली आहे. ट्रस्टच्या बैठकीत माजी एअर मार्शल असलेले जितेंद्र मिश्रा यांच्या हाती मंदिराचा कारभार सोपवण्यावर शिक्कामोर्तब झाला. जितेंद्र मिश्रा यावर्षी ३९ वर्षांच्या सेवेनंतर ३० एप्रिलला निवृत्त झाले आहेत. माहितीनुसार, राम मंदिर ट्रस्टच्या पहिल्या सीईओपदासाठी आज बैठक होती. त्यात निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची पहिले सीईओ म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्याशिवाय ३ नवे ट्रस्टी बनवण्यात आले. ज्यात अयोध्याचे मदन मोहन पांडेय, शिकोहाबादचे निर्मला यादव आणि दिल्लीचे महेश भगचंदका यांचा समावेश आहे. ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास यांच्या निवासस्थानी ही बैठक पार पडली. सेवानिवृत्त न्या. प्रमोद कोहली यांच्या नेतृत्वातील समितीने ३ जणांची नावे सोपवली होती. त्यात राम मंदिर ट्रस्टचे पहिले सीईओ एन्काऊंटर स्पेशलिस्ट राजेश पांडेय होतील अशी चर्चा होती.

**कोण आहेत जितेंद्र मिश्रा ?**

जितेंद्र मिश्रा एअर फोर्सच्या पश्चिमी तटाचे मुख्य होते. त्यांच्याकडे ३ हजार तास उड्डाणाचा अनुभव आहे. त्यांनी ऑपरेशन सिंदूरमध्येही मोठी भूमिका निभावली. टायगर हिल आणि सफेद सागर ऑपरेशनमध्येही मिश्रा यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यांनी एअर फोर्सच्या कार्यकाळात १८ हून अधिक लढाऊ विमाने, ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्ट आणि हेलिकॉप्टर उडवले आहेत. ऑपरेशन सिंदूरमधील महत्त्वाच्या भूमिकेबाबत त्यांना स्वातंत्र दिनी सर्वोत्तम युद्ध सेवा मेडल पुरस्कार देण्यात आला आहे.

---

# भागी गावात बांधकामाचा स्लॅब कोसळला; एका मजुराचा मृत्यू, तीन गंभीर जखमी





**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यात बांधकाम सुरू असताना स्लॅब कोसळून भीषण अपघात झाला. ग्रामपंचायत गोटाबळी अंतर्गत येणाऱ्या भागी गावात घडलेल्या या दुर्घटनेत चार मजूर स्लॅबखाली दबले. यामध्ये एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, तीन मजूर गंभीर जखमी झाले आहेत.

भागी गावातील अनिल बीसेन यांच्या घराचे बांधकाम सुरू होते. हे बांधकाम ठेकेदाराला स्क्वेअर फुटाच्या हिशोबाने देण्यात आले होते. त्यानुसार ठेकेदाराने मजूर लावून बांधकामाचे काम सुरू केले होते. दरम्यान, स्लॅब टाकण्याचे काम सुरू असताना स्लॅबला आधार देणाऱ्या बल्ली अचानक खचल्या. त्यामुळे संपूर्ण स्लॅब अचानक खाली कोसळला.

स्लॅब कोसळताच काम करणारे चार मजूर त्याखाली दबले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. बचावकार्य करून मजुरांना बाहेर काढण्यात आले. या दुर्घटनेत दिनेश नाईक (वय ३८), रा. सालेगाव, ग्रामपंचायत मुल्ला, ता. देवरी यांचा मृत्यू झाला. तर अन्य तीन मजूर गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने देवरी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने प्राथमिक उपचारानंतर तिघांनाही पुढील उपचारासाठी गोंदिया येथील केटीएस रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे.

दरम्यान, बांधकामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्यात आले होते का, स्लॅबला योग्य पद्धतीने आधार देण्यात आला होता का, तसेच बांधकाम साहित्य व तांत्रिक बाबींची योग्य तपासणी करण्यात आली होती का, याबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. ठेकेदाराच्या कामातील कथित हलगर्जीपणामुळे हा अपघात झाल्याचा आरोपही केला जात आहे. मात्र, स्लॅब कोसळण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणाचा पोलिसांकडून तपास सुरू असून, तपासानंतरच अपघाताचे नेमके कारण आणि यासाठी कोणाची जबाबदारी आहे, हे स्पष्ट होणार आहे.

---

# गणेशोत्सवात यंदा पुण्यात लेझर लाईटवर बंदी

**वृत्तसंस्था, पुणे**

देशभरात गणेशोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून पुण्यातील सांस्कृतिक, पारंपरिक गणपती उत्सवासाठी येथील मंडळे सज्ज झाली आहेत. मात्र, यंदाही पुण्यातील गणेशोत्सवाच्या अनुषंगाने डीजे, ध्वनीक्षेपक आणि लेझर लाईट, धांगडधिंगा हा प्रश्न प्रामुख्याने समोर आला आहे. त्यातच आज पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी पुण्यात गणेशोत्सव काळात लेझर लाईटला बंदी राहणार असून, ध्वनिप्रदूषणाचे नियम न पाळल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल केला जाईल, असा इशाराही जिल्हाधिका-यांनी दिला. त्यामुळे यंदा धांगडधिंग्याला काही अंशी का होईना रोखण्यास मदत होणार आहे.

पुण्यातील नागरिक विद्यानंद बापट यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण बैठकीत हा मुद्दा लावून धरला. त्यानंतर त्यांचा व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला असून आता गणेशोत्सवात डीजे बंदी आणि ध्वनी प्रदूषणाविरुद्ध मोहीम सुरू झाल्याचे दिसून येत आहे. पुण्यात विद्यानंद बापट यांनी डीजेमुक्त गणेशोत्सवाचा आग्रह धरला असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ त्यांनी दिला. त्याच पार्श्वभूमीवर आता अनेक पुणेकरांनी एकत्र येत ध्वनीप्रदूषण आणि वाहतूक रहदारीच्या मुद्यावरून भूमिका मांडली तर जिल्हाधिका-यांनीही कायदेशीर भूमिका मांडली. दरम्यान, लेझर लाईटमुळे भाविकांच्या डोळ्यांवर विपरित परिणाम होत असल्याची बाब समोर आली. त्यामुळे यालाही विरोध होत आहे.

यंदाच्या गणेशोत्सवात पुणे शहरात लेझर लाईटवर बंदी राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. तसेच गणेशोत्सव काळात ध्वनी प्रदूषणासंदर्भाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई होणार, असे स्पष्ट आदेश देण्यात आल्याचेही डुडी यांनी सांगितले. पुण्यात कोर्टाच्या नियमांचे पालन करूनच गणेशोत्सव साजरा होणार आहे. त्यासाठी सर्व गणेश मंडळांसोबत बैठका घेऊन नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे गणेश मंडळांना डीजेबाबत न्यायालयाच्या नियमांचे पालन करावे लागणार आहे,

**सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे पालन करा**

ध्वनी प्रदूषणाबाबत कोर्टाच्या आदेशांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन डुडी यांनी केले तर नियमांचे उल्लंघन केल्यास गुन्हे दाखल होणार, असेही जिल्हाधिका-यांनी ठणकावले. त्यामुळे लेजर लाईटची चमक कुठेही दिसणार नाही आणि डीजेसारखे ध्वनिप्रदूषणाचे वाद्यही फारसे वाजविले जाण्याची चिन्हे नाहीत. कारण संबंधित मंडळावर गुन्हा दाखल होऊ शकतो.

---

# सासरच्या घरात घुसून जावयाचा थरार : चाकूहल्ल्यात दोन भावांसह मित्र गंभीर जखमी

## घटस्फोटाचा खटला मागे घेण्यास नकार दिल्याने संताप, बल्लारपूर पोलिसांकडून आरोपी जावयाला अटक

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

बल्लारपूर न्यायालयात सुरू असलेला घटस्फोटाचा खटला मागे घेऊन पत्नीला आपल्यासोबत पाठविण्याच्या मागणीला नकार दिल्याने संतप्त झालेल्या जावयाने सासरच्या घरात घुसून चाकूने हल्ला केल्याची गंभीर घटना बल्लारपूर शहरातील बुध्द नगर वॉडातील विश्वशांती चौक, टीचर कॉलनी परिसरात मंगळवारी १ सप्टेंबर रोजी सायंकाळी घडली. या हल्ल्यात पत्नीचे दोन भाऊ आणि त्यांचा मित्र असे तिघे जखमी झाले असून, दोघा भावांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना चंद्रपूर येथे उपचारासाठी हलविण्यात आले. या प्रकरणी बल्लारपूर पोलिसांनी आरोपी जावयाला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सानिया मिर्झा हिचा २०२१ मध्ये चंद्रपूर येथील शहानवाज हुसेन शेख जमीर याच्यासोबत विवाह झाला होता. लग्नानंतर काही काळाने पती-पत्नीमध्ये वाद सुरू झाल्याने सानिया ही आपल्या मुलासह वडिलांच्या घरी बल्लारपूर येथे राहत होती. पतीविरुद्ध चंद्रपूर येथे गुन्हा दाखल असून, दोघांचा घटस्फोटाचा खटला न्यायालयात सुरू असल्याचे तक्रारीत नमूद आहे. मंगळवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास



शहानवाज हा एका तरुणासह अँक्टिव्हा दुचाकीवरून सासरच्या घरी पोहोचला. त्याच्यासोबत आलेला तरुण घराबाहेर थांबला, तर शहानवाज घरात शिरला. न्यायालयात सुरू असलेला खटला मागे घ्या आणि पत्नीला माझ्यासोबत पाठवा, अशी मागणी त्याने केली. मात्र, खटला न्यायालयात सुरू असून तो होऊ द्यावा, असे सासऱ्याने सांगितले. यावरून वाद विकोपाला गेला. आरोपीने पत्नीचा हात पकडल्याने तिच्या भावांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर आरोपीने शिवीगाळ करत सर्वांना जीवे मारण्याची धमकी दिली आणि खिशातून चाकू काढला. त्याने साळा अयान बेग (२३) याच्यावर चाकूने वार केल्याने त्याच्या डोक्याला आणि पोटाला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर मुस्सवीर बेग (२१) याच्यावरही चाकूने वार करण्यात आला. हल्ला रोखण्यासाठी पुढे आलेल्या ताजखान पठाण याच्या हातावरही आरोपीने चाकूने वार केला.

तिघांवर हल्ला केल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून अँक्टिव्हा दुचाकीने पसार झाला. रक्तबंबाळ अवस्थेतील जखमींना तातडीने बल्लारपूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर दोघा भावांना पुढील उपचारासाठी चंद्रपूर येथे हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच बल्लारपूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार बिपिन इंगळे, सहायक पोलिस निरीक्षक मदन दिवटे, सफौ गजानन डोईफोडे यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपी शहानवाज हुसेन शेख जमीर याला अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास बल्लारपूर पोलिस करीत आहेत.

---

# शिवसेना कुणाची? पुन्हा तारीख!

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

शिंदे गटाचे वकील नीरज कौल यांनी शिवसेनेत फूट का पडली? याचे कारणच आज कोटार्ला सांगितले. यावेळी त्यांनी पहिल्याच युक्तिवादात काँग्रेस आणि भाजपचा उल्लेख केला. भाजपसोबत युती करून विधानसभेची निवडणूक लढली गेली. निकाल आल्यानंतर ज्यांच्या विरोधात निवडणूक लढली त्यांच्यासोबत आघाडी करून सत्ता स्थापन करण्यात आली. त्यामुळे पक्षात असंतोष होता आणि त्यातूनच पक्षात उठाव झाला, असा युक्तिवाद शिंदे गटाचे वकील नीरज कौल यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर कौल यांनी युक्तिवाद केला.

निवडणुका भाजप सोबत लढल्या मात्र नंतर वेगळे होण्याचा निर्णय घेतला गेला. ज्यांच्याविरुद्ध निवडणुका लढवल्या त्यांच्यासोबत नंतर युती केली गेली. त्यामुळे पक्षातून उठाव झाला. ठाकरे काँग्रेससोबत गेले म्हणून पक्षात असंतोष होता हीच आमची भूमिका आहे असे वकील नीरज कौल म्हणाले.

**आमचीच शिवसेना खरी**

विचारसरणी आणि विरोधी पक्षाच्या युतीमुळे पक्षात फूट पडली, असे सांगतानाच आमचीच मूळ शिवसेना असल्याचा दावा त्यांनी केला. तसेच विधीमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष एकच असल्याचा दावाही कौल यांनी आजच्या सुनावणीवेळी केला.

संपादकीय लेखणीतून...

# वगळलेले मतदार

महाराष्ट्र राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने 'विशेष सखोल पुनरिक्षण २०२६' अंतर्गत महाराष्ट्राची नवी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली आहे. या नव्या यादीतून २,०६,८८,४८७ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. गणना प्रपत्र न मिळणे, मतदार गैरहजर असणे, स्थलांतर, मृत्यू किंवा दुबार नोंदणी यासारख्या कारणांमुळे ही नावे समाविष्ट झालेली नसल्याचे सांगण्यात आले आहे. नव्या प्रारूप मतदार यादीमध्ये ३,९५,८९,९०५ पुरुष मतदार आणि ३,७५,७२,५७० महिला मतदारांचा समावेश आहे. याशिवाय ३,०८७ तृतीयपंथी मतदारांची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक मतदाराने आपले नाव प्रारूप मतदार यादीत आहे की नाही, याची खात्री करून घेणे आवश्यक आहे. मतदारांना आपले नाव नव्या प्रारूप यादीत आहे की नाही हे निवडणूक आयोगाच्या अधिकृत वेबसाईटवर तपासता येणार आहे. यासाठी 'सीईओ महाराष्ट्र'च्या अधिकृत वेबसाईटवर जाऊन 'प्रारूप मतदार यादी २०२६' हा पर्याय निवडून आपले नाव तपासून पाहता येईल. प्रारूप मतदार यादीतून नाव वगळले गेले असल्यास संबंधित नागरिकांना दावे आणि हरकती नोंदवण्याची संधी देण्यात आली आहे. यासाठी ३१ ऑगस्ट २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. याशिवाय नवीन मतदार म्हणून नाव नोंदवू इच्छिणाऱ्या नागरिकांनाही या कालावधीत अर्ज करता येणार आहे. १ ऑक्टोबर २०२६ किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणारे नागरिक नवमतदार म्हणून पात्र ठरणार आहेत. दावे आणि हरकतींची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. एसआयआर प्रक्रियेदरम्यान राज्यातील मतदान केंद्राचे सुसूत्रीकरणही करण्यात आले आहे. यापूर्वी राज्यात १,००,२५३ मतदान केंद्रे होती. त्यापैकी ४३१ केंद्रे कमी करण्यात आली आहेत. याशिवाय ३९४ नवीन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

त्यामुळे आता राज्यात एकूण १,००,२१६ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. मतदारांच्या सोयीसाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने १,४०३ मतदान केंद्रांचे स्थळ बदलण्यात आले आहे. ही केंद्रे तात्पुरत्या रचनेतून पक्क्या आणि सुरक्षित इमारतींमध्ये हलवण्यात आली आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदाराने आपले नाव प्रारूप मतदार यादीत तसेच मतदान केंद्र तपासून घेणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी त्यांच्या मतदारसंघातल्या मतदार यादी घोटाळ्याचे सत्य कथन केले आहे. मतदारांची नावे वगळणे, दुबार मतदारांना संरक्षण देणे व त्यांच्या नावावर संध्याकाळी बोगस मतदान करून घेणे, असे उद्योग तेव्हा निवडणुकीच्या काळात घडवून आणले गेले. याला आदर्श निवडणूक पद्धती मानता येणार नाही. आता पुन्हा राज्यातील दोन कोटींवर मतदारांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. यावर आयोगाचे म्हणणे आहे की, ७५.५२ लाख मतदारांनी यादीत नावे नोंदवण्यात अनास्था दाखवली. १७ लाख मतदारांची नावे दुबार असल्याने ती नावे वगळण्यात आली. आता एक स्वच्छ, पवित्र मतदार यादी प्रसिद्ध होईल. निवडणुका जिंकण्यासाठी भाजप नवनवे फंडे शोधत असते. यावेळी मोठ्या प्रमाणात जेन-झी मतदार वगळले जाण्याची भीती आहे.

कारण या मोठ्या नवमतदार वर्गाने मोदी-शहा-फडणवीसांच्या विरोधात बंड पुकारले आहे. त्यामुळे त्यांचा मतदानाचा हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न होईल, तो हाणून पाडायला हवा. त्यासाठी तरुण वर्गाला अधिक सावधान राहावे लागेल. मतदार यादीतील भ्रष्टाचार आणि घोटाळा हेच भाजपचे नवे हत्यार आहे. ते हत्यार आता बोथट करावे लागेल, असे शिवसेनेने म्हटले आहे. निवडणूक आयोगाने इशारा दिला आहे की, जर एखाद्याने खोटी माहिती सादर केली तर लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० च्या कलम ३१ अन्वये खोटी माहिती देणे हा एक वर्षापर्यंतचा तुरुंगवास, दंड किंवा दोन्ही शिक्षांना पात्र गुन्हा नोंदवला जाणार आहे. महाराष्ट्रात तीन महिन्यांपासून विशेष सखोल पुनरिक्षण सुरू होते. घरोघरी जाऊन केलेली पडताळणी आणि डिजिटायझेशनसाठीचा फॉर्म जमा न होणे तसेच इतर काही तांत्रिक बाबींमुळे मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर प्रारूप यादीत आलेली नाहीत.




# मूर्त्यांची वाढती उंची चिंताजनक

**लीलाधर दवंडे**
**कामठी (नागपूर)**

लोकमान्य टिळकांनी ब्रिटिशांच्या जुलमी धोरणाप्रती जागृती करण्याच्या उद्देशाने जनतेला एकत्र आणण्यासाठी महाराष्ट्रात सार्वजनिक गणेश उत्सव सुरू करण्याला आणि श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी सार्वजनिक गणेश उत्सव साजरा करण्याला आता शंभराहून अधिक काळ लोटत आला असावा. या शतकीय वाटचाली दरम्यान सार्वजनिक गणेश उत्सवात बरेच बदल घडून आलेत. तंत्रज्ञान वाढले आणि याचा पुरेपूर फायदा गणेश मंडळांनी घेतला.

अजूनही काही गणेश मंडळे भारतीय संस्कृती आणि गणेश उत्सवाचे अध्यात्मिक महत्त्व जपत पर्यावरणपूरक कार्यक्रम घेऊन, रक्तदान, सामान्य ज्ञान स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, साहसी खेळ, मैदानी खेळ स्पर्धा घेऊन जनजागृतीचे कार्य करतात. त्यांचे खरेच अभिनंदन करायला पाहिजे. मात्र, काही गणेश मंडळांत गेल्या काही काळांपासून जणू काही स्पर्धा चालल्यागत वातावरण निर्माण झाले आहे आणि हे वातावरण गणेश उत्सवाचे मूळ रूप हरवून मंडळांच्या कार्यकर्त्यांना जसे हवे, त्याप्रमाणे आयोजन केले जात आहे. यातून गणेश मूर्तींची वाढत चाललेली उंची देखिल सुटलेली नाही. अशावेळी खुद्द मूर्तिकार असलेले अरुण दाते यांनी "गणपतीच्या मूर्तींच्या उंचीवर निर्बंध आणायला हवेत!" असे केलेले विधान मंडळांनी विचारात घ्यायला पाहिजे.

नुकतेच २३ ऑगस्ट रोजी मुंबईतील भुलेश्वर भागात येणाऱ्या गणपती उत्सवाची तयारी म्हणून गणरायाची २२ फूट उंच मूर्ती वाजत गाजत मंडपात नेत असतांना घडलेल्या दुर्घटनेत २ जण ठार झालेत तर पाच जण जखमी झालेत. या दुर्घटनेनंतर मात्र बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने दुखवटा जाहीर केला असून, आगामी आगमन मिरवणुकीत वाजंत्री आणि इतर कोणत्याही प्रकारचा जल्लोष करू नये, असे आवाहन केले आहे. राज्यात सध्या सर्वत्र रस्त्यांवर मेट्रो, पूल वगैरेचे बांधकाम सुरू असल्याने जागोजागी गतिरोधक बसविलेले आहेत.शिवाय राज्यातील बहुतांश ठिकाणी रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. याकडे सरकारचे लक्ष नाही, असेही नाही. यामुळे बहुदा मूर्तीची बांधणी खिळखिळी होऊन मूर्ती कोसळल्याची शंका व्यक्त केल्या जात आहे. सुखकर्ता दुःखहर्ता म्हणून ज्या गणरायाला ओळखले जाते, पूजल्या जाते. त्याच गणरायाच्या आगमना प्रसंगी अशी दुर्दैवी घटना घडणे म्हणजे एक प्रकारे उत्सवांत वाढत चाललेली स्पर्धा, मूर्तीची अनावश्यक वाढत चाललेली उंची, डॉल्बीचा कर्णकर्कश आवाज आणि मिरवणुकी दरम्यान असलेला कार्यकर्त्यांचा अतिउत्साह यास सावध होण्याचा जणू काही संकेतच म्हणावा लागतो. विशेष म्हणजे या दुर्घटनेनंतर सुद्धा मुंबईतील उंच मूर्तींना कर्नाटक,गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान सारख्या राज्यांतून प्रचंड प्रमाणात मागणी वाढली असून एका माहितीनुसार यंदा २ हजारांपेक्षा अधिक मूर्त्या परराज्यांत रवाना होणार आहेत. आता काही मंडळांनी प्रवासाच्या दृष्टीने बैठ्या मूर्तींना पसंती दर्शवली आहे, हे तरी बरे.

गेल्या काही काळाचा विचार करतो म्हटले तर मिरवणुकींचे पारंपरिक स्वरूप बदलून त्यात अवाढव्यता वाढीस लागली आहे. एखाद्या मोहर्रम निमित्त निघणाऱ्या डोल्यांचे मनोरे सुद्धा आता अधिक मजली व्हायला लागले आहेत. कित्येक शोभायात्रांत एकावर एक डॉल्बी लावून उंच थर रचला जातो. भारतात हैदराबादमधील खैरताबादचा गणपती त्याच्या सुमारे ६० ते ७० फूट अशा अवाढव्य उंचीसाठी प्रसिद्ध आहे. अनेक ठिकाणी गणपती, देवींच्या मूर्तींची उंची तीस, चाळीस फूट अशी व्हायला लागली आहे. जणू, दैवतांना पाच फूट, दहा फुटांची उंची मान्यच नसावी. काहींच्या मते हा विरोध विशिष्ट धर्मीयांच्या उत्सवातच का? तर, हा विरोध उत्सवाला नसून त्यात होत असलेल्या आततायी गोंधळाला आहे. उत्सवाच्या माध्यमातून होत असलेल्या



राजकारणाला आहे. आपणच विचार करायला हवा की, या गोष्टी गणरायाला सुद्धा मान्य असतील काय? काही काळापूर्वी लहान आकाराच्याच मूर्त्या बसविण्यात येत होत्या ना! मग,त्यावेळी अध्यात्मिक भाव नव्हता काय?

राज्यात आधीच अर्ध्याधिक रस्त्यांचे बांधकाम सुरू असतांना जागोजागी गतिरोधक बसविलेले आहेत. त्यातल्या त्यात रस्त्याच्या दुतर्फा बनविलेले पादचारी मार्ग राहत्या लोकांनी आणि व्यावसायिकांनी गिळंकृत केल्याने रस्ते अरुंद झाले आहेत. अगदीच बोळ म्हणावी असे रस्ते वाटायला लागले आहेत. त्यातल्या त्यात याच रस्त्यांवर दुतर्फा लावण्यात येणारी वाहने रहदारीला अडथळा ठरतात. शहरात आणि गावोगावी वाढलेले केबलचे जाळे प्रत्येक चौकाचौकांत दिसून येईल. अशावेळी स्पर्धा करून आपण मूर्तींची उंची अधिक ठेवण्याचा अट्टाहास धरत असू तर त्या मूर्तींची मिरवणूक काढतांना किती त्रास होतोय, याचा अंदाज तरी लावायला हवा. या दरम्यान होणारा वाहतुकीचा खोळंबा आणि मिरवणुकीत वाजणारे डॉल्बी यामुळे नवजात बालकांसह आजारी व्यक्तींचे काय हाल होत असतील याचा तरी विचार करायला हवा.

उत्सव एकदाच असतो, हे मान्य केले तरी असे सर्वधर्मीय उत्सव हल्ली दर महिन्याला होत असतात. यातून जनतेला वेठीस धरण्याचा हक्क आपणास कुणी दिला? उत्सव तर आनंदाचा सोहळा असायला हवा, न की त्यात कुणाच्या घरातील आधार हरवला जावा. आता तर राजकारण्यांनी अनेक उत्सव काबीज केल्याने ते स्वतःच यात सहभागी असतात. दहीहंडी आयोजित करून उंचच उंच थरांचे मनोरे उभारले जातात. मात्र, दरवर्षी या उत्सवात कितीतरी गोविंदा जखमी होतात आणि कितीतरी युवांना आपले प्राण गमवावे लागते. पयार्याने कार्यकर्त्यांना उधाण येऊन अशा विघ्नांत अधिकच भर पडली जाते. एकीकडे पर्यावरणाच्या दृष्टीने पीओपी मूर्त्यांवर बंदी आणली जाते आणि दुसरीकडे दैवतांच्या मूर्तींची उंची वाढवली जाते, हे योग्य तरी आहे काय? यामुळे काही मूर्तिकार, अन्य व्यावसायिक यांचा फायदा होतो हे नक्की असले तरी लहान मूर्त्या बसवून वाचलेला पैसा इतर मनोरंजन, स्पर्धा, सामाजिक कार्ये यात खर्च केला तर बिघडणार आहे काय? कायदे आहेत, मात्र त्याचा धाक नावापुरता मर्यादित असल्याने दिवसेंदिवस मूर्तींची उंची वाढणे, ढोल ताशांच्या ऐवजी कर्णकर्कश डॉल्बी, मर्यादेपेक्षा अधिक गोविंदाचे थर या गोष्टी सहज घडायला लागल्या आहेत.

भुलेश्वर भागातील घटनेची शाई नाही वाळत ते ठाण्यातील मुंब्रा परिसरातील गणेशमूर्ती घेऊन जाणाऱ्या ट्रॉलीचे चाक अचानक घसरले. कार्यकर्त्यांनी वेळीच प्रसंगावधान राखल्याने पुढील दुर्घटना टळली. मात्र, तरीही मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मोठ मोठ्या मूर्त्या बसविण्याचा अट्टाहास सोडायला हवा. पुणे पोलिसांनी आता मिरवणुकीत वापरण्यात येणारे प्लाज्मा आणि लेजर किरण यावर पूर्णतः बंदी घातली आहे. मात्र, मंडळांच्या कार्यकर्त्यांनी ही बाब मनावर घेणे गरजेचे आहे. पुण्यात ५०००० हून अधिक सार्वजनिक गणपती बसतात. यातील जवळपास २०० गणेश मंडळांनी यंदा डीजेमुक्त गणपती उत्सव साजरा करण्याचा निर्धार केलेला आहे. या निधार्राचे सर्वत्र अनुकरण व्हायला हवे. या निर्धाराचे कौतुक व्हायला पाहिजे. नागपुरात सुद्धा नुकत्याच झालेल्या समन्वय बैठकीत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मात्र, तरीही मूर्तींची उंची वाढत जात असेल तर चित्र चिंताजनकच समजावे.

- ८४१२८७७२२०

# महाप्रलयातील तो अभेद्य पाया : विज्ञानाचा आणि मानवी जिद्दीचा वस्तुपाठ

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

नेपाळमध्ये नुकत्याच आलेल्या भीषण महाप्रलयाने निसर्गाचे अत्यंत रौद्र आणि विदारक रूप जगाला दाखवले. समाजमाध्यमांवर वेगाने व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये सभोवतालचे सर्व काही उद्ध्वस्त होत असताना, पाण्याच्या महाभयंकर प्रवाहात एक घर अविचल उभे राहिलेले दिसले. त्या घरातील कुटुंबाने साक्षात मृत्यूच्या जबड्यातून स्वतःला सुखरूप बाहेर काढले. वरवर पाहता हा एखादा दैवी चमत्कार किंवा नशिबाचा खेळ वाटू शकतो; मात्र, या घटनेच्या मुळाशी गेले असता त्यामागे दडलेले आहे ते स्थापत्यशास्त्राचे अचूक विज्ञान आणि जगण्याची दुर्दम्य मानवी इच्छाशक्ती. ही केवळ एका घराच्या बचावाची कथा नाही, तर विज्ञान, तंत्रज्ञान आणि मानव्यशास्त्र यांच्यातील अन्वयाची, आणि मानवी विचारांना एका नव्या, परिवर्तनात्मक दिशेकडे नेणारी एक अत्यंत महत्त्वाची घटना आहे. निसर्गाचा कोप आणि मानवी अस्तित्व यांच्यातील हा संघर्ष आपल्याला जगण्याचा एक अत्यंत मोलाचा आणि सखोल धडा देऊन जातो.

या घराच्या बचावामागे 'आरसीसी फ्रेम स्ट्रक्चर' हे मुख्य वैज्ञानिक आणि तांत्रिक कारण आहे. सामान्यतः, आजही अनेक घरे 'लोड-बेअरिंग' पद्धतीने बांधली जातात. या पारंपरिक पद्धतीमध्ये घराच्या छताचा आणि संपूर्ण इमारतीचा भार विटांच्या किंवा दगडांच्या भिंतींवर असतो. अशा वेळी पुराच्या पाण्याचा प्रचंड हायड्रोडायनॅमिक दाब जेव्हा भिंतीवर पडतो, तेव्हा भिंत कोसळताच संपूर्ण छत आणि घर पत्त्यांच्या बंगल्यासारखे एका क्षणात खाली येते. परंतु, नेपाळमधील हे घर काँक्रीट आणि लोखंडाच्या मजबूत खांबांवर आणि तुळयांवर उभे होते. पुराच्या पाण्याचा अफाट रेटा जेव्हा या घराला धडकला, तेव्हा विटांच्या भिंती तो दाब सहन करू शकल्या नाहीत आणि त्या तुटल्या. वरवर पाहता हे नुकसान वाटले तरी, भिंती तुटल्यामुळेच पाण्याच्या प्रवाहाला घरातून आरपार जाण्यासाठी मोकळी वाट मिळाली. यामुळे इमारतीच्या मुख्य सांगाड्यावरील पाण्याचा प्रचंड दाब आपोआप कमी झाला. जर या भिंती तुटल्या नसत्या आणि पाण्याला अडथळा निर्माण झाला असता, तर त्या रेट्याने संपूर्ण घर मुळासकट उखडले गेले असते. यासोबतच घराचा पाया अतिशय खोल आणि मजबूत असल्यामुळे पाण्याचा प्रचंड वेग मुख्य खांबांना विचलित करू शकला नाही. योग्य तंत्रज्ञान, दूरदृष्टी आणि नियोजनाचा हा एक आदर्श वस्तुपाठ आहे, जो भविष्यातील बांधकामांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो.

विज्ञानाच्या या अचूक नियमाचा मानवी जगण्याशी आणि मानसिकतेशी अतिशय जवळचा आणि सखोल संबंध आहे. "पाया मजबूत असेल तर कोणतीही वादळे किंवा महाप्रलय तुम्हाला उखडून फेकू शकत नाहीत," हे विधान या वास्तूसोबतच मानवी आयुष्यालाही तंतोतंत लागू पडते. मानवी जीवनातही अनेकदा नैराश्य, आर्थिक नुकसान, अपयश, किंवा नातेसंबंधांमधील दुरावा यांसारखे 'महाप्रलय' अचानक धडकतात. आजच्या काळात अनेक जण अशा संकटांना घाबरून आत्महत्या किंवा जीवन संपवण्यासारखे टोकाचे आणि नैराश्यपूर्ण निर्णय घेतात. मात्र, नेपाळच्या या कुटुंबाने साक्षात मृत्यू समोर तांडव करत असतानाही जीव वाचवण्यासाठी जी अचाट आणि अमानुष धडपड केली, ती खऱ्या अर्थाने मानवी जिद्दीचे सर्वोच्च प्रतीक आहे. ज्याप्रमाणे घराचा मुख्य भार खांबांवर असतो, त्याचप्रमाणे माणसाच्या आयुष्याचा भार त्याच्या आत्मविश्वास, संयम, आशावाद आणि जीवनमूल्ये या अदृश्य पण भक्कम 'पिलर्स'वर अवलंबून असतो. जर माणसाचा मानसिक पाया खंबीर असेल, तर बाह्य परिस्थितीची कितीही मोठी वादळे किंवा संकटे त्याला आतून मोडू शकत नाहीत.

एखाद्या इमारतीचे अस्तित्व जसे तिच्या अदृश्य पण खोलवर रुजलेल्या पायावर अवलंबून असते, तसेच माणसाचे अस्तित्व त्याच्या आत दडलेल्या मानसिक बळकटीवर अवलंबून असते. जेव्हा पुराचे पाणी वाढत होते आणि सभोवतालचा विनाश दिसत होता, तेव्हा त्या कुटुंबाकडे वाचण्याची कोणतीही हमी नव्हती, पण 'आपण टिकून राहू' आणि 'ही वेळ निभावून नेऊ' हा आत्मविश्वासच त्यांचा सर्वांत मोठा आधार होता. हाच आत्मविश्वास मानवी आयुष्यातील कोणत्याही आर्थिक, सामाजिक किंवा मानसिक नैराश्यावर मात करण्यासाठी प्राथमिक आणि सर्वांत भक्कम पाया ठरतो. पाण्याचा वेग ओसरेपर्यंत त्या कुटुंबाने जो अफाट संयम दाखवला, तोच संयम माणसाला त्याच्या वाईट आणि पडत्या काळात ठेवावा लागतो. अपयश किंवा नातेसंबंधांतील दुरावा हे पुराच्या पाण्यासारखे असतात; ते येतात, धडकतात आणि कालांतराने ओसरतात. या संपूर्ण घटनेतून मिळणारा सर्वांत मोठा आणि व्यावहारिक धडा म्हणजे 'लवचिकता'. पुराच्या प्रचंड दाबासमोर घराच्या भिंतींनी आपला हट्ट सोडला आणि त्या कोसळल्या, म्हणूनच मुख्य घर आणि त्यातील माणसांचे प्राण वाचले. अगदी त्याचप्रमाणे, आयुष्यात जेव्हा एखादे मोठे संकट येते, तेव्हा माणसाने आपला अहंकार, जुन्या सवयी आणि अवास्तव अपेक्षांच्या 'भिंती' पाडून परिस्थितीशी जुळवून घेण्याची लवचिकता दाखवली पाहिजे. जे लोक संकटात ताठर राहतात, ते तुटतात; पण जे प्रवाहाचा दाब समजून घेत स्वतःमध्ये लवचिकता आणतात, ते नक्कीच तरून जातात.

आजच्या धकाधकीच्या आणि वाढत्या स्पर्धेच्या युगात, मानसिक ताणतणाव आणि नैराश्य हे मानवी आयुष्यातील 'अदृश्य महाप्रलय' बनले आहेत. क्षुल्लक अपयश, नोकरी जाणे, परीक्षेत कमी गुण मिळणे किंवा नात्यांतील दुराव्यामुळे अनेक जण जेव्हा स्वतःला संपवण्याचे निर्णय घेतात, तेव्हा ते खऱ्या अर्थाने परिस्थितीसमोर हार मानत असतात. अशा लोकांचा मानसिक पाया अत्यंत कमकुवत झालेला असतो, ज्यावर आलेला थोडासा दाबही त्यांना उद्ध्वस्त करतो. अशावेळी नेपाळच्या त्या कुटुंबाचा संघर्ष समाजासाठी एका दीपस्तंभासारखा ठरतो. साक्षात मृत्यू डोळ्यांसमोर अक्राळविक्राळ रूप धारण करून उभा असताना त्यांनी मृत्यूला शरण जाण्याचा विचार केला नाही, तर शेवटच्या श्वासापर्यंत मृत्यूशी दोन हात केले. यातून हेच सिद्ध होते की, मानवी जीवनात येणारी संकटे ही आपल्याला संपवण्यासाठी नसून, आपली लवचिकता आणि अंतर्भूत ताकद तपासण्यासाठी येतात. बाह्य परिस्थितीच्या महाप्रलयावर आपले नियंत्रण नसते, पण त्या परिस्थितीला आपण कसा प्रतिसाद देतो हे पूर्णपणे आपल्या हातात असते. नेपाळमधील महाप्रलयात टिकून राहिलेले ते घर केवळ एक वास्तू राहिलेली नसून, ती विज्ञानाचा अचूक वापर आणि 'कधीही हार न मानण्याच्या' मानवी वृत्तीचे एक जिवंत स्मारक बनली आहे. आयुष्याची मूल्ये आणि जगण्याची आस जेवढी प्रबळ, तेवढाच कोणत्याही संकटाचा प्रभाव क्षीण ठरतो, हाच खऱ्या अर्थाने मानवी अस्तित्वाला दिशा देणारा चिरंतन आणि शाश्वत विचार आहे.

# अफगाणिस्तान विरुद्ध दुखापतग्रस्त खेळाडूंची निवड का?

**डॉ.दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांची टी-२० मालिका १३ ते १७ सप्टेंबर दरम्यान दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर खेळवली जाईल. बीसीसीआयने मंगळवारी या मालिकेसाठी १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. श्रेयस अय्यरला कर्णधार आणि तिलक वमार्ला उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. वास्तविक या मालिकेचे यजमानपद भारताकडे नसून अफगाणिस्तानकडे आहे. परंतु भारतात या मालिकेचे आयोजन होण्याचे मुख्य कारण म्हणजे अफगाणिस्तानमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम नाहीत. आफगाणिस्तान आयोजित करत असलेले परदेशी संघांचे सामने भारतात किंवा दुबईत खेळले जातात. तथापि, संघात अशा चार खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे, ज्यांची सामन्यांसाठी उपलब्धता अद्याप तंदुरुस्तीच्या मंजुरीवर अवलंबून आहे. यामध्ये स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह, अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर आणि नितीश कुमार रेड्डी, आणि वेगवान गोलंदाज हर्षित राणा यांचा समावेश आहे. बीसीसीआयने अधिकृत संघ यादीत या चार खेळाडूंच्या नावांसोबत "तंदुरुस्तीच्या मंजुरीच्या अधीन" असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

**जेव्हा पर्याय उपलब्ध होते, तेव्हा त्यांना का निवडले नाही?**

इथूनच निवड समितीच्या निर्णयावर चर्चा सुरू होते. एखाद्या खेळाडूची निवड करून त्याच्या तंदुरुस्तीच्या मंजुरीची वाट पाहणे हे स्वतःच चुकीचे नाही, विशेषतः जेव्हा तो खेळाडू संघाचा एक महत्त्वाचा सदस्य असतो. पण प्रश्न हा आहे कीः सुरुवातीच्या संघात या खेळाडूंचा समावेश करणे आवश्यक होते का? या चारही खेळाडूंना यापूर्वी दुखापती आणि फिटनेसच्या समस्यांचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे, पुनरागमनानंतर त्यांना सामन्यासाठी आवश्यक असलेला फिटनेस पुन्हा मिळवण्यासाठी पुरेसा वेळ देणे हा एक महत्त्वाचा घटक ठरू शकतो. आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी तंदुरुस्त असणे आणि सामन्यासाठी पूर्णपणे सज्ज असणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. एखादा खेळाडू फिटनेस चाचणीत उत्तीर्ण झाला तरी, दीर्घ विश्रांतीनंतर थेट टी-२० क्रिकेटमध्ये परतणे आव्हानात्मक ठरू शकते. अशा परिस्थितीत, निवड समितीने त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या पयार्यांचा विचार करायला हवा होता.

**या खेळाडूंना संधी मिळू शकली असती**

भारताकडे टी-२० क्रिकेटमध्ये पर्यायांची कमतरता नाही. वेगवान गोलंदाजी विभागात, जसप्रीत बुमराहच्या जागी भुवनेश्वर कुमार, मोहम्मद सिराज किंवा मयंक यादव यांसारख्या खेळाडूंचा विचार केला जाऊ शकला असता. त्याचप्रमाणे, वॉशिंग्टन सुंदरच्या जागी कृणाल पांड्याला संधी देण्याचा पर्याय होता. नितीश कुमार रेड्डीच्या जागी सिराज किंवा मयंकसारख्या खेळाडूने संघाची गोलंदाजीची जोडी अधिक मजबूत केली असती. हर्षित राणाच्या जागी प्रिन्स यादवसारख्या युवा वेगवान गोलंदाजाला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःला सिद्ध करण्याची संधी देता आली असती. त्यापूर्वी त्याने मिळालेल्या संधीचे सोने केलेच आहे.

हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे की, बीसीसीआयने संघात युवा प्रतिभेचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. वैभव सूर्यवंशीचे पुनरागमन हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. देशांतर्गत आणि आयपीएलमध्ये दमदार कामगिरी केलेल्या इतर खेळाडूंनाही संधी होती.

**हा केवळ अफगाणिस्तान मालिकेसाठीचा संघ नाही का?**

या निवडीकडे केवळ तीन सामन्यांच्या मालिकेच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही. हाच १५ सदस्यीय संघ जपानमधील आशियाई खेळांसाठीही वापरला जाईल. त्यामुळे, आगामी स्पर्धांसाठी एक सज्ज संघ तयार राहावा यासाठी निवड समितीला आपले प्रमुख खेळाडू त्याच गटात कायम ठेवायचे असण्याची शक्यता आहे. बुमराहसारख्या खेळाडूची उपस्थिती संघासाठी एक मोठा फायदा आहे, परंतु त्याच्या तंदुरुस्तीबाबतचा धोकाही तितकाच मोठा आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# परिवहन समितीच्या बैठकीत विविध विषयांना मंजुरी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
मनपाच्या परिवहन समितीची बैठक सभापती मंगला खेकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात झालेल्या बैठकीत परिवहन समितीचे उपसभापती सुधीर(बंडू) राऊत, सदस्य विजय होले, सदस्या अर्चना पडोळे, रुपाली ठाकूर, प्रमिला मथरानी, मंगला मस्के, पूजा पाठक, सदस्य शैलेश पांडे, दिनेश यादव, शकील पटेल यांच्यासह परिवहन व्यवस्थापक मिलिंद मेश्राम, परिवहन प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे, व्यवस्थापक ऑपरेशन राजीव घाटोळे, व्यवस्थापक अँडमिन गजानन नागूलवार, लेखाधिकारी चौलवार यांच्यासह इतर



अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ आणि घरभाडे भत्ता, बस चालक-वाहकांसाठी मोफत स्मार्ट स्वच्छतागृह, 'देवदर्शन यात्रा बस सर्किट'चा शुभारंभ तसेच जुन्या स्क्रॅप बसेसच्या विल्हेवाटीबाबतचे निर्णय घेण्यात आले आहेत.
यात शासन अधिसूचना दिनांक १४/१०/२०२४ नुसार कंत्राटी सहाय्यक, मेंटेनन्स व ऑपरेशन कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ सुचवण्यात आली आहे. तसेच डिझेल बस ऑपरेटरच्या मूळ किलोमीटर दरात रू ४.११ प्रति किमी वाढ आणि पीएमआय कर्मचाऱ्यांकरिता वाढ तसेच घरभाडे भत्ता सुमारे १ हजार ८८० वाहक कर्मचाऱ्यांना 'महाराष्ट्र कामगार किमान घरभाडे भत्ता कायदा, १९८३' नुसार दरमहा सुमारे रू ९५२- इतका एचआरए प्रस्तावित करण्यात आला आहे. हा विषय सूचनेसह मंजूर करण्यात आला. याशिवाय मोर भवन डेपो-२ येथील स्मार्ट सार्वजनिक स्वच्छतागृहाचा वापर बस चालक, वाहक व कर्मचाऱ्यांसाठी पूर्णपणे विनामूल्य (निःशुल्क) करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.
नागपूर शहर व परिसरातील प्रमुख धार्मिक व सांस्कृतिक स्थळांना जोडण्यासाठी (उदा. टेकडी गणेश, दीक्षाभूमी, मोठा ताजबाग, स्वामिनारायण मंदिर, कोरडी, चिचोली इ.) विशेष बस सेवा सुरू करण्यात येत आहे.
सद्यस्थितीत प्रायोगिक तत्त्वावर दररोज ८ तासांच्या ट्रिपमध्ये 'Chalo Mobility Call Centre' द्वारे ऑन-डिमांड आणि डिजिटल बुकींग करून ही सेवा शनिवार व रविवार (वीकेंडला) देखील उपलब्ध असणार आहे.
प्रस्तावित भाडे (८ तासांसाठी):
४० आसनी बसः रू.७,०००/-
३० आसनी बसः रू.६,०००/-
२५ आसनी बसः रू.५,०००/-
JNNURM योजनेअंतर्गत आयुर्मान पूर्ण झालेल्या एकूण ११४ स्क्रॅप बसेसपैकी विशेष कामांसाठी काही बसेस राखीव ठेवण्यात आल्या आहेत. यातील ०२ बसेस 'स्त्री महाशक्ती प्रकल्पाकरिता' तर ०४ बसेस 'कंटीन व सार्वजनिक हितास्तव' राखीव ठेवण्यात येतील. उर्वरित १०८ स्क्रॅप बसेसची MSTC मार्फत ऑनलाइन ई-लिलाव पद्धतीने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून विल्हेवाट लावली जाईल.

## वृंदावन नगरातील अवैध गॅस रिफिलिंग अड्ड्यावर धाड : ५१ सिलेंडर जप्त

**आप पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्यानंतर पुरवठा विभागाची कारवाई; ग्राहकांची फसवणूक आणि सुरक्षेचा गंभीर प्रश्न**

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर - (धनंजय पांढरे )**
शहरातील वृंदावन नगर परिसरात सुरू असलेल्या अवैध गॅस रिफिलिंग रॅकेटचा पुरवठा विभागाने पर्दाफाश केला. टिनाच्या गोडाऊनमध्ये भरलेल्या घरगुती गॅस सिलेंडरमधून गॅस काढून तो रिकाम्या सिलेंडरमध्ये भरण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या कारवाईत ४३ घरगुती आणि ८ व्यावसायिक असे एकूण ५१ गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले. वृंदावन नगरातील या अवैध अड्ड्यावर काही दिवसांपासून लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती आहे. आम आदमी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रकाराचा माग काढून अन्नधान्य वितरण विभाग तसेच पोलिसांना माहिती दिल्यानंतर संबंधित यंत्रणांनी कारवाई केली.
या ठिकाणी विशेष नोझलच्या सहाय्याने भरलेल्या सिलेंडरमधून गॅस काढून दुसऱ्या रिकाम्या सिलेंडरमध्ये भरला जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. या प्रक्रियेमुळे ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सिलेंडरमध्ये दोन ते अडीच किलोपर्यंत गॅस कमी मिळत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अन्नधान्य वितरण अधिकारी सुमेर चवरे यांच्या नेतृत्वाखाली चंद्रपूर शहर पुरवठा विभागाच्या पथकाने अड्ड्यावर धाड टाकली. कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणात सिलेंडर जप्त करण्यात आले. जप्त सिलेंडर गोपिका इंडेन गॅस एजन्सीशी संबंधित असल्याची माहिती पुरवठा विभागाने दिली आहे. दरम्यान, गॅस एजन्सींमधून ग्राहकांच्या घरासाठी निघणारी वाहने या ठिकाणी येत होती का, तसेच या अवैध रिफिलिंगमध्ये एजन्सीतील कर्मचारी किंवा इतर संबंधित व्यक्तींचा सहभाग आहे का, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे.अवैध पद्धतीने गॅस रिफिलिंग करताना मोठा सुरक्षा धोका निर्माण होतो. गॅस गळती अथवा आग लागल्यास परिसरात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे हा अड्डा किती दिवसांपासून सुरू होता आणि या रॅकेटमागे नेमके कोण आहेत, याचा तपास प्रशासन व पोलिसांकडून करण्यात येणार आहे. .या प्रकरणातील संबंधित व्यक्तीविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील कलम ३ व ७ अन्वये कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पुरवठा विभागाने दिली. कारवाईत अधिकारी अमित खडतकर व अरविंद शेंडे यांच्यासह पथक सहभागी होते.

## मनपाची शाडू मातीच्या गणेशमूर्ती कार्यशाळा आज

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुलांमध्ये श्री गणेशाविषयी आदरभाव निर्माण करण्यासोबतच पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविण्याच्या उद्देशाने गुरूवार ३ सप्टेंबर २०२६ रोजी रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट्ट सभागृह येथे सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

## शासकीय विभागीय ग्रंथालयाच्या ग्रंथपालपदी मीनाक्षी कांबळे

### नागरिकांना ग्रंथसंपदेचा लाभ घेण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
शासकीय विभागीय ग्रंथालयाच्या ग्रंथपाल पदाचा कार्यभार मीनाक्षी कांबळे यांनी नुकताच स्वीकारला. यापूर्वी त्या गोंदिया येथील जिल्हा ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून कार्यरत होत्या.



येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात अभ्यासिका आणि स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त पुस्तकांसह कथा-कविता संग्रह, कादंबऱ्या, चरित्रे, मासिके आणि अवांतर वाचनाचे साहित्य उपलब्ध असून सद्यःस्थितीत या ग्रंथालयात २ लाख ६३ हजार ९३५ इतकी ग्रंथसंपदा असल्याची माहिती श्रीमती कांबळे यांनी दिली.
ग्रंथालयाचे सभासदत्व घेण्यासाठी वाचकांनी विहित नमुन्यातील अर्जासह द्विवार्षिक प्रवेश शुल्क १०० रुपये आणि अनामत रक्कम ५०० रुपये रोख भरावे.
अर्जातील हमीपत्रावर शासनमान्य शैक्षणिक संस्थाप्रमुख, राजपत्रित अधिकारी अथवा कार्यालय प्रमुख यांची स्वाक्षरी आवश्यक आहे. सभासदांना घरी वाचनासाठी १४ दिवसांच्या मुदतीने एक ग्रंथ दिला जातो. नागपूर जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या समृद्ध ग्रंथसंपदेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथपाल मीनाक्षी कांबळे यांनी केले आहे.

## ११ सप्टेंबरला पांढुर्ण्यात गोटमार मेळा, प्रशासन सज्ज, गोफणीवर बंदी!

### ड्रोन आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून मेळ्यावर करडी नजर, नियम तोडणाऱ्यांवर कठोर कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
मध्य प्रदेशातील पांढुर्णा येथे ऐतिहासिक व पारंपरिक गोटमार मेळा ११ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात होणार आहे. मेळ्याच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था, सुरक्षा, वाहतूक, गर्दी नियंत्रण, पार्किंग तसेच नागरिकांच्या सुविधांची तयारी करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने शांती समितीची महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. मेळा शांततेत, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा, यासाठी प्रशासनाने कडक नियोजन केले आहे.
बैठकीला पोलीस अधीक्षक प्रकाश चंद्र परिहार, अतिरिक्त जिल्हाधिकारी ज्योती ठाकूर, अतिरिक्त पोलीस अधीक्षक मनकामना प्रसाद, संयुक्त



जिल्हाधिकारी नेहा सोनी, एसडीएम अलका एक्का, पांढुर्णा आमदार निलेश उईके, भाजपचे जिल्हाध्यक्ष संदीप मोहोड, नगरपालिकेचे अध्यक्ष संदीप घाटोळे यांच्यासह अधिकारी, लोकप्रतिनिधी व पत्रकार उपस्थित होते.
गोटमार मेळ्यात गोफणीच्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. बंदीचे उल्लंघन करून गोफणीचा वापर करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. मेळ्यादरम्यान सकाळी ८ वाजल्यापासून मेळा संपेपर्यंत पोलीस व प्रशासनाकडून सतत देखरेख ठेवण्यात येणार आहे. परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासोबतच ड्रोनच्या माध्यमातूनही संपूर्ण परिसरावर नजर ठेवली जाणार आहे.
मोठ्या संख्येने नागरिक व भाविक मेळ्यासाठी येण्याची शक्यता असल्याने वाहतूक आणि पार्किंग व्यवस्थेवर विशेष भर देण्यात आला आहे. शहरातील उपलब्ध मोकळ्या जागांमध्ये पार्किंगची व्यवस्था केली जाणार असून, मोठ्या वाहनांसाठी शहराबाहेरील निश्चित ठिकाणी पार्किंगची सुविधा करण्यात येणार आहे.
मेळ्याच्या काळात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नेहमी शुक्रवारी भरणारा साप्ताहिक बाजार यावेळी शुक्रवारऐवजी मंगळवारी भरविण्यात येणार आहे. याबाबत संबंधित विभागांना आवश्यक नियोजन व समन्वयाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
गोटमार मेळा ही पांढुर्ण्याची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख आहे. त्यामुळे मेळ्याची परंपरा व प्रतिष्ठा कायम ठेवत नागरिकांनी शांतता, संयम आणि आपसी बंधुभाव राखावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करून मेळा शांततेत पार पाडण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

## खापरखेडा पोलिसांची समयसूचकता : पत्नी व दिराचे वाचविले प्राण, आरोपी पतीला अटक

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील सिल्लेवाडा येथील चांदनी चौक परिसरात १ सप्टेंबर मंगळवारला रात्रीच्या सुमारास एका पतीने स्वतःच्या पत्नीसह सख्या भावावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला मात्र खापरखेडा पोलिसांच्या डीबी पथकाने समयसूचकता दाखवत घटनास्थळी वेळेवर धाव घेतली व मोठा अनर्थ टळला सदर घटनेत पोलिसांनी आरोपीची पत्नी व दिराचे प्राण वाचविले असून आरोपी पतीला बेड्या ठोकल्या आहेत. असरफ मनोद्दीन राईन वय ३० रा.चांदणी चौक, सिल्लेवाडा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.
प्राप्त माहितीनुसार, मंगळवारी रात्री असरफ याचे पत्नी आमना हिच्यासोबत काही कारणावरून भांडण झाले वाद विकोपाला गेल्याने रागाच्या भरात असरफने पत्नीला चाकूने मारण्याचा प्रयत्न केला यावेळी आरोपीचा भाऊ व फिर्यादी मोहम्मद असरत मेनुद्दीन राईन हा आपल्या वहिनीला वाचवण्यासाठी गेला मात्र यावेळी संतप्त झालेल्या असरफने कमरेला खोचून ठेवलेले दोन चाकू काढून स्वतःच्या भावावरही जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला.
दरम्यान खापरखेडा पोलीस ठाण्याच्या डीबी पथकातील पोलीस हेडकॉन्स्टेबल संदीप सगने, पोलीस शिपाई आशिष मेश्राम, बादल गिरी आणि शेखर वानखडे हे परिसरात गस्तीवर होते. त्यांना सदर घटनेची माहिती मिळाली यावेळी क्षणाचाही विलंब न करता आरोपीचे घर गाठले व आरोपी असरफला ताब्यात घेतले खापरखेडा पोलीस ठाणे डीबी पथकातील पोलिसांच्या समयसूचकते मूळे आरोपीची पत्नी आमना व त्याचा भाऊ मोहम्मद या दोघांचे प्राण वाचले.

पोलीस नेहमी घटनास्थळी उशिरा पोहोचतात असा आरोप सर्वसामान्य नागरिकांकडून अनेकदा व्यक्त केला जातो परंतु सदर घटनेत खापरखेडा पोलिस ठाणे डीबी पथकातील पोलीस कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परते मुळे दोन लोकांचे जीव वाचले आहेत. खाकी वर्दीतील या देवदूतांनी केलेल्या या धाडसी व समयसूचक कामगिरी चे खापरखेडा व सिल्लेवाडा परिसरात सर्वत्र कौतुक केले जात आहे.




याप्रकरणी खापरखेडा पोलिसांनी आरोपीवर कलम ४२५ बिएनएस १३५ अन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली असून सूचना पत्र देऊन सोडले.

थोडक्यात

## दोन गोवंशांची सुटका, ४.८२ लाखांचा मुद्देमाल जप्त

### भिवापूर पोलिसांची कारवाई




**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
कत्तलीच्या उद्देशाने गोवंश जनावरांची अमानुषपणे वाहतूक करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांच्या नाकाबंदीत दोन गोवंश जनावरे कोंबून घेऊन जाणारे टाटा एस वाहन पकडण्यात आले. मात्र, पोलिसांना पाहताच चालकाने वाहन दूर अंतरावर थांबवून अंधाराचा फायदा घेत पलायन केले. या कारवाईत पोलिसांनी दोन गोवंशांची सुटका करत तब्बल ४ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दिनांक २ सप्टेंबर रोजी भिवापूर पोलीस हद्दीत अवैध धंद्यांविरोधात पेट्रोलिंग सुरू असताना पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, गोवंश जनावरांची कत्तलीसाठी अवैधरित्या वाहतूक केली जात आहे. या माहितीची खात्री करून पोलिसांनी भिवापूर-उमरेड मुख्य मार्गावरील भिवापूर एमआयडीसी टी-पॉईंट येथे नाकाबंदी केली. दरम्यान, एमएच-०४/एचडी-१९२७ क्रमांकाचे टाटा एस वाहन पोलिसांच्या दिशेने येताना दिसले. पोलिसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला. मात्र, पोलिसांना पाहताच चालकाने काही अंतरावर वाहन थांबवले आणि अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाला. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता आत दोन गोवंश जनावरे अत्यंत दाटीवाटीने कोंबून ठेवलेली आढळून आली. जनावरांना चारापाण्याची कोणतीही व्यवस्था नव्हती. तसेच शिंगांना व पायांना आखूड दोरखंडाने बांधून त्यांची अमानुष वाहतूक केली जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.
पंचांसमक्ष पोलिसांनी ४ लाख ५० हजार रुपये किमतीचे टाटा एस वाहन आणि ३२ हजार रुपये किमतीची दोन गोवंश जनावरे, असा एकूण ४ लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी टाटा एसच्या अज्ञात चालकाविरुद्ध भिवापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक फरार झाला असला तरी पोलिसांनी वाहन जप्त करून गोवंशांची सुटका केल्याने अवैध वाहतूक करणाऱ्यांना चांगलाच दणका बसला आहे. फरार चालकाचा पोलीस शोध घेत आहेत.

## नक्षी येथे रक्षाबंधनासह विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
गट ग्रामपंचायत नक्षी, उच्च प्राथमिक शाळा नक्षी आणि विद्यानिकेतन विद्यालय, नक्षी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्षाबंधन व स्कूल बॅग वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये बंधुभावाची भावना रुजविण्यासोबतच शैक्षणिक साहित्याची मदत करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाला भाजपाचे युवक नेते रोहित पारवे, गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव, सहाय्यक गटविकास अधिकारी भोगे, ठाणेदार रवींद्र मस्कर, सरपंच अनिकेत वराडे, पत्रकार शारद मिरे, उपसरपंच राजेंद्र आदमने, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रमोद राऊत, माजी पोलीस पाटील प्रभाकर राऊत, सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर तुरक, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर वराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.
यावेळी उच्च प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका नंदा गिरडकर, श्रीमती इखार, शिक्षक पाटील, मुंडले तसेच विद्यानिकेतन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ठाकरे, वराडे, राऊत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वितरण करण्यात आल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. ग्रामपंचायत, शाळा आणि ग्रामस्थांच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

## दत्तवाडीत संत गणपती महाराज जयंतीनिमित्त रविवारी सामाजिक एकता परिषद

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
सत्यशोधक समाजसुधारक संत गणपती उर्फ हरि महाराज यांच्या १४१व्या जयंतीनिमित्त दत्तवाडी, धम्मकीर्ती नगर येथील राजगृह



वाचनालयात रविवार, ६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता 'समता, बंधुता, न्याय, एकता' या संकल्पनेवर सामाजिक एकता परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय समाजप्रबोधनकार मोहनदास चोरे व व्याख्याते विजय इंगळे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार असून अध्यक्षस्थानी रविदादा मानव राहणार आहेत. प्रा. डॉ. सुरेंद्र मालिक व इंजि. अरविंद माळी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करतील.
जात-धर्माच्या भिंती ओलांडून सामाजिक एकता, बंधुता व न्यायाचा संदेश देणाऱ्या या परिषदेला नागरिकांनी सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सन्मित्र सभेचा स्थापना दिवस ६ सप्टेंबर रोजी

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
सन्मित्र सभेचा ५५ वा स्थापना दिवस ६ सप्टेंबर रोजी साजरा केला जाईल. याप्रसंगी, सभेच्या ज्या सदस्यांनी वयाची ६० आणि ७५ वर्षे पूर्ण केली आहेत, तसेच ज्या जोडप्यांनी वैवाहिक जीवनाची ५० वर्षे पूर्ण केली आहेत, त्यांचा सत्कार केला जाईल. प्रख्यात वक्ते आणि संस्कार भारतीचे अखिल भारतीय महासचिव, आशुतोष अडोनी, 'कृष्ण नीतीः सद्यस्थिती' या विषयावर व्याख्यान देतील. हा कार्यक्रम सायंकाळी ५:३० वाजता गोकुळपेठ येथील डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या अनंतराव भिडे सभागृहात आयोजित केला जाईल. सन्मित्र सभेचे अध्यक्ष अनिल शेंडे आणि सचिव वृषाली शिलेदार यांनी सर्वांना उपस्थित राहण्याची विनंती केली आहे.

थोडक्यात

## भारत माता चौक येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात रक्षाबंधन साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

भारत माता चौक, आशीर्वाद नगर येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी रक्षाबंधनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. आशीर्वाद योग नृत्य परिवाराच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात महिलांनी शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे सिद्धू कोमजवार यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा स्नेहबंध अधिक दृढ केला. रक्षाबंधन हा भाऊ- बहिणीच्या प्रेम, आपुलकी, विश्वास आणि संरक्षणाच्या नात्याचे प्रतीक मानला जातो. याच भावनेतून आशीर्वाद योग नृत्य परिवारातील महिलांनी सिद्धूजी कोमजवार यांना राखी बांधून त्यांच्या पुढील आयुष्यासाठी सुख, समृद्धी, आरोग्य आणि यशाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित महिलांनी सांगितले की, सिद्धूजी कोमजवार हे नेहमीच आपल्या सर्व बहिणींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी मदतीसाठी पुढे येण्याचा त्यांचा स्वभाव असून, त्यांच्या या आपुलकीच्या नात्यामुळे महिलांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास व जिव्हाळा निर्माण झाला आहे. राखीच्या पवित्र धाग्यातून हा विश्वास आणि प्रेम अधिक दृढ झाले.

राखी बांधल्यानंतर सिद्धूजी कोमजवार यांनी उपस्थित सर्व भगिनींचे आभार मानत, त्यांच्या सुख- दुःखात आणि अडचणीच्या काळात सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे वचन दिले. या भावनिक क्षणी उपस्थित महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाला सिद्धूजी कोमजवार यांच्या पत्नी आशा कोमजवार यांच्यासह वंदना प्रकाश अहेरे, विनिता अव्हाडकर, ललिता खडगी, अर्चना भद्रे, नवनीत सौन्दी, तारा वंजारी, लता सूर्यवंशी, छाया कुरवाडे, निर्मला लिंमजे, सोनाली सिरसाम, प्रणिती धांडे, विजया दिवे, स्मिता जगताप, जयश्री कोहळे, कुंदा आदमने, दर्शना गोस्वामी, मनीषा चौधरी, वर्षा आदमने आदी महिला उपस्थित होत्या. रक्षाबंधनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून केवळ सणाचा आनंद साजरा न करता महिला आणि सामाजिक कार्यकर्त्यांमधील बहीण- भावाचे प्रेम, विश्वास, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## मौदा पोलिसानी २४ तासात केला घरफोडीचा गुन्हा उघड



**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

दि. ३१/०८/२०२६ रोजी फिर्यादी नामे विशाल रामकृष्ण वासनिक, राह. माथणी, ता. मौदा यांनी पोलीस ठाणे, मौदा येथे येवुन रिपोर्ट दिली की, दि. ३०/०८/२०२६ रोजीचे रात्री दरम्याण घरी कोणीही नसतांना कोणीतरी अज्ञात आरोपीने घराचे दरावाजाचे कुलुप तोडुन घरातील आलमारातील सोन्याचे दागीणे २१ ग्रॅम कि. ७०,३००/-रु. चा मुद्देमाल चोरुन नेले आहे. असे फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ३०५ (अ), ३३१ (४) भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेण्यात आलेला होता. सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठांचे आदेशान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक सारीन दुर्गे, पोलीस ठाणे मौदा यांनी गुन्हे प्रगटीकरण पथकास आदेश देवुन त्वरीत अज्ञात आरोपीचा शोध घेण्याकरीता रवाना केले असता पो.स्टे. परीसरात अज्ञात आरोपीचा शोध घेत असतांना सदर गुन्ह्यात माथणी येथील आशय धर्मदास वासनिक, वय १९ वर्षे व त्याचा अल्पवयीण साथीदाराने सदर घरफोडी केली असल्याची गोपणिय माहीती मिळाल्यावरुन दोघांनाही ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले. यावरुन आरोपीचे ताब्यातुन सोन्यांचे २१ ग्रॅम दागीणे कि. ७०,३००/-रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन घरफोडीच्या गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

सदर कारवाई हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा., अनिल मस्के, अपर पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा., शशांत एन.एम., उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान, यांचे मार्गदर्शणात सारीन दुर्गे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे मौदा यांचे सोबत पोलीस स्टॉप सपोनि/राहुल किटे, पोलीस अंमलदार- संदीप कडु, गणेश मुदमाळी, रुपेश महादुले, शिवाजी दिंडे यांनी केली आहे.

## हिवरी नगर येथे ६ सप्टेंबर रोजी भव्य दहीहंडीचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



ऑरेंज सिटी स्पोर्ट्स अँड कल्चरल सेंटर तसेच दुनेश्वर पेठे मित्र परिवारातर्फे भव्य दहीहंडीचे आयोजन ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता प्रशांत हायस्कूल समोर,हिवरी नगर येथे करण्यात आले आहे. ही दहीहंडी नागपूर शहरातील सर्वात मोठ्या दहीहंडीपैकी एक अशी मानली जाते. यावेळी पुरस्कार म्हणून यावर्षी ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येणार आहे. या दहीहंडीचे हे दहावे वर्ष आहे.यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची विनंती आयोजक दुनेश्वर पेठे यांनी केली आहे.

# मोवाडला कचिकुडा एक्स्प्रेसचा थांबा कधी मिळणार?

### ८० महिन्यांपासून प्रवाशांची गैरसोय, लोकप्रतिनिधींसह नगरपरिषद सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेकडे नागरिकांचे लक्ष

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड-अमरावती रेल्वेमार्ग सुरू होऊन अनेक वर्षे झाली असली तरी मोवाड रेल्वे स्थानकाच्या समस्या अद्याप कायम आहेत. कोरोना काळात बंद झालेला कचिकुडा एक्स्प्रेसचा मोवाड येथील थांबा आजतागायत पूर्ववत करण्यात आलेला नसल्याने परिसरातील हजारो प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तब्बल ८० महिन्यांचा कालावधी उलटूनही मोवाडला कचिकुडा एक्स्प्रेसचा थांबा मिळत नसल्याने आता नागरिकांचा संयम सुटत असून, स्थानिक आमदार, खासदार तसेच मोवाड नगरपरिषदेतील सत्ताधाऱ्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

१४ जानेवारी २०२१ पासून कचिकुडा एक्स्प्रेसची सेवा सुरू झाली. कोरोना काळापूर्वी या गाडीचा मोवाड येथे थांबा होता. मात्र कोरोना काळात बंद करण्यात आलेला थांबा अद्याप सुरू करण्यात आलेला नाही.



मोवाड हे मध्यप्रदेश सीमेलगत तसेच अमरावती जिल्ह्याच्या सीमेजवळील महत्त्वाचे ठिकाण असून, या रेल्वे स्थानकावर मोवाडसह परिसरातील सुमारे २५ ते ३० गावांतील नागरिक अवलंबून आहेत. खैरगाव, देवग्राम, मदना, जलालखेडा, भरसिंगी, गणेशपूर, पोरगव्हाण, उमरी, हिवरा, गोधनी, पांढरी यासह अनेक गावांतील शेकडो प्रवासी दररोज रेल्वेने प्रवास करतात.

कचिकुडा एक्स्प्रेसचा मोवाड येथे थांबा नसल्याने अनेक प्रवाशांना पहाटेची गाडी पकडण्यासाठी रात्रीच घराबाहेर पडावे लागते. काही प्रवाशांना पहाटे साडेचार वाजताच नरखेड रेल्वे स्थानक गाठावे लागते. महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, नोकरदार आणि व्यापाऱ्यांना यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. मोवाड येथे थांबा मिळाल्यास पहाटे सुमारे ५.१० वाजता कचिकुडा एक्स्प्रेसमधून प्रवास करता येणार असून, नागरिकांची पायपीट आणि आर्थिक भुर्दंड मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

मोवाडच्या रेल्वे थांब्याचा प्रश्न यापूर्वीही अनेकदा उपस्थित करण्यात आला आहे. माजी खासदार तथा विद्यमान आमदार कृपाल तुमाने यांनी रेल्वे मंत्र्यांकडे याबाबत पाठपुरावा केल्याचे सांगितले जाते. मात्र अद्याप या पाठपुराव्याला ठोस यश मिळालेले नाही. त्यामुळे आता विद्यमान स्थानिक आमदार आणि खासदार या प्रश्नासाठी किती प्रभावीपणे पाठपुरावा करतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या काळात मोवाडच्या विकासाबाबत अनेक आश्वासने देण्यात आली. नगरपरिषद निवडणुकीच्या काळातही स्थानिक प्रश्न सोडविण्याची आश्वासने नागरिकांना देण्यात आली. मात्र निवडणुका संपल्यानंतर आश्वासनांची आठवण सत्ताधाऱ्यांना राहिली नाही, अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. केंद्रात, राज्यात आणि स्थानिक स्वराज्य संस्थेत सत्तेची ताकद असतानाही मोवाडच्या रेल्वे प्रश्नासाठी ठोस निर्णय का होत नाही, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

नरखेड आणि काटोल परिसरातील रेल्वे थांब्यांबाबत निर्णय होत असताना मोवाडसारख्या महत्त्वाच्या स्थानकाला मात्र डावलले जात असल्याची नाराजीही व्यक्त होत आहे. मोवाडला पूर्वी थांबा असताना तो पुन्हा सुरू करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींची आहे. केवळ निवडणुकीच्या काळात आश्वासनांचा पाऊस पाडण्याऐवजी जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडित हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याची मागणी होत आहे.

मोवाड रेल्वे स्थानकाच्या विकासाचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा, स्वच्छता, पिण्याचे पाणी, प्रकाश व्यवस्था, बसण्याची व्यवस्था आणि इतर मूलभूत सुविधांकडेही रेल्वे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. कचिकुडा एक्स्प्रेसचा थांबा आणि रेल्वे स्थानकाचा विकास या दोन्ही मागण्यांसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

'आश्वासन नको, आता प्रत्यक्ष कृती हवी. मोवाडला कचिकुडा एक्स्प्रेसचा थांबा मिळालाच पाहिजे,' अशी संतप्त भावना नागरिकांमध्ये असून, आगामी काळात या मागणीसाठी आंदोलन उभारण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. त्यामुळे मोवाडच्या जनतेचा हा ज्वलंत प्रश्न स्थानिक आमदार, खासदार आणि नगरपरिषद सत्ताधारी गांभीर्याने घेणार का, की पुन्हा एकदा आश्वासनांचेच गाजर दाखवले जाणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## काटोल येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त 'लोक कला महोत्सव' संपन्न

### महाराष्ट्र शाहीर अमर शेख यांना आदरांजली

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकताच काटोल येथील मंजुळाबाई वानखेडे बहुद्देशीय संस्था, श्री संत गाडगेबाबा ग्रामसेवा संस्था, राष्ट्र संत सम्येक संदेश फाउंडेशन समता बहुउद्देशीय संस्था,मागासवर्गीय गोपाल समाज कल्याणकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२६ ला संत कबीर कुटी सभागृह, काटोल येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून भव्य 'लोक कला महोत्सव'२०२६ पार पडला. कार्यक्रमात महाराष्ट्राचे थोर शाहीर अमर शेख यांना देखील भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.या महोत्सवाचे उद्घाटन लोक कलावंत जिल्हा अध्यक्ष री पा. ई.नरेंद्र डोंगरे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष नरेशजी अरसडे होते, तर प्रमुख अतिथी महाराष्ट्र शासन पुरस्कृत शंकर ठोसर,पुतळा सम्राट नितीन तायवाडे,लोक कलावंत प्रकाश राऊत, शाहीर ज्ञानेश्वर तायवाडे, अशोक लोणारे, शाहीर रविंद्र सोमकुंवर, लोक कलावंत राजु वानखेडे,लोक कलावंत संदेश गणवीर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर संस्थेच्या वतीने प्रास्ताविक शिंगारे यांनी मांडले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि शाहीर अमर शेख यांच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व सामाजिक चळवळीतील योगदानावर प्रकाश टाकला. उद्घाटन प्रसंगी नरेंद्र डोंगरे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना




आदरांजली देतांना वैजयंता हिने कला जोपसण्यासाठी व परिवाराचा उदरनिर्वाह करण्यासाठी आठ महिन्याची गरोदरअसतानाही गीत सादर करतअतिशय मग्न होऊन शेवटी त्याच स्टेजवर वैजयंता प्रसूती झाली या उदाहणाने मार्गदर्शन केलेत.

यानंतर लता जाधव, सावित्री डोंगरे, ज्योत्सना धवराळ, जयमाला मनोहर, मंगला ढोणे सीमा वानखेडे, वैशाली ढोणे, आशा मेंढे, मंजुळा वानखेडे, वंदना गजबे, वैशाली इंगळे, निशा तायवाडे, चंद्रशेखर तायवाडे, अशोक वानखेडे, मधुकर शेंडे, दिलीप महंत, अशोक रोकडे, मोरेश्वर एकटीया, विठ्ठल लोणकर, रेखा गावंडे तारा राकसे, शोभा सोमकुवर, रिठा पाटील, नंदा नासरे, नंदा मनोहर, सुनीता तायडे, कोमल दुपारे, शंकर चौधरी, दिलीप भोयर नरेश चौधरी, नामदेव निमकर सतिश ठोसर व इतर कलावंतांनी लोककलेचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे बहारदार संचालन सीमा वानखेडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर तायवाडे यांनी मानले. या लोक कला महोत्सवाला काटोल परिसरातील नागरिक आणि कलाप्रेमी उपस्थित होते.

## भंडारा येथील कृष्ण मंदिर वार्डात ४ सप्टेंबरपासून कृष्ण जन्मोत्सव व गोपाळकाला महोत्सव

**दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा**

येथील कृष्ण मंदिर वार्ड स्थित श्रीकृष्ण देवस्थान पंच कमिटीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री कृष्ण जन्माष्टमी व गोपाळकाला (दहीहंडी) उत्सवाचे अतिशय भव्य दिव्य आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दिनांक ४ सप्टेंबर आणि शनिवार, दिनांक ५ सप्टेंबर २०२६ असे दोन दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. उत्सवाच्या पहिल्या दिवशी, शुक्रवार, ४ सप्टेंबर रोजी सकाळी ०९:३५ वाजता श्री राधाकृष्ण मूतीर्चा महाअभिषेक, श्रृंगार, पूजन व आरती संपन्न होईल. दुपारी १२:०० वाजता समस्त भक्तगणांतर्फे सामूहिक 'हरे कृष्ण, हरे राम' महामंत्राचा जप केला जाईल. दुपारी २ ते ५ या वेळेत 'श्री राधाकृष्ण महिला भजन मंडळ' तर्फे भक्तीमय भजनांचा कार्यक्रम होईल. सायंकाळी ६:४० वाजता आरती व प्रसाद वितरण केले जाईल.



रात्री १०:३० वाजता भक्ती संगीताचा बहारदार कार्यक्रम होणार असून, ठीक रात्री १२:०० वाजता मुख्य आकर्षण असलेला 'बाल गोपाळ जन्मोत्सव' सोहळा, मंगल महाआरती आणि भव्य आतिषबाजीने साजरा केला जाईल. शनिवार, ५ सप्टेंबर रोजी दुपारी १२:०० वाजता पारंपरिक भजन आणि भव्य दहीहंडी उत्सव व गोपाळकाला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या दोन्ही दिवशी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी दर्शनाचा आणि प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीकृष्ण देवस्थान पंच कमिटी, भंडारा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जुनापाणी शाळेची शेवटच्या क्रमांकावरून प्रथम क्रमांकापर्यंत झेप

### जुनापाणी जिल्हा परिषद शाळेचा लोकसहभागातून कायापालट, मुख्याध्यापक प्रमोद बोडखे यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांना यश, गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे शाळेकडे वाढता कल

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र बनू शकते, हे जुनापाणी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेने दाखवून दिले आहे. काही वर्षांपूर्वी केंद्रात शेवटच्या क्रमांकावर असलेली ही शाळा आज केंद्रात प्रथम क्रमांकावर पोहोचली आहे. मुख्याध्यापक प्रमोद संपतराव बोडखे यांच्या नियोजनबद्ध कामकाजामुळे, शिक्षकांच्या सहकार्यामुळे आणि ग्रामस्थांच्या लोकसहभागामुळे शाळेने ही उल्लेखनीय प्रगती साधली आहे.



मुख्याध्यापक प्रमोद बोडखे यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. त्यांच्या प्रयत्नातून शाळेत इयत्ता आठवीचा वर्ग सुरू करण्यात आला. परिसरातील सहा गावांतील विद्यार्थ्यांना या शाळेत प्रवेश मिळत असून पालकांचा शाळेवरील विश्वास वाढत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसाठी मुख्याध्यापक बोडखे हे स्वतःच्या वाहनातून विद्यार्थ्यांची ने-आण करतात. विद्यार्थ्यांना शाळेत येताना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी ते स्वतः पुढाकार घेतात. त्यांच्या या विद्यार्थी-केंद्री कार्यपद्धतीचे पालकांकडून विशेष कौतुक केले जात आहे. जिल्हा परिषद शाळेच्या गुणवत्तेवर स्वतःचा विश्वास असल्याचे मुख्याध्यापक प्रमोद बोडखे यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना आपल्याच शाळेत प्रवेश दिला आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांबाबत पालकांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी त्यांचा हा निर्णय महत्त्वाचा ठरला आहे.

बोडखे यांच्या कामामुळे परिसरातील अनेक पालकांनी खासगी शाळांमधून आपल्या मुलांची नावे काढून जुनापाणी जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतला आहे. त्यामुळे शाळेतील विद्यार्थीसंख्येत वाढ झाली असून सरकारी शिक्षणव्यवस्थेबद्दलचा विश्वासही बळकट झाला आहे.

ज्या शाळेत आपण शिक्षण घेतले, त्या शाळेसाठी काहीतरी केले पाहिजे, या भावनेतून जुनापाणी येथील माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या सहकार्यामुळे शाळेत डिजिटल शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. लोकवर्गणीच्या माध्यमातून शाळेची रंगरंगोटी, बोलक्या भिंती, इलेक्ट्रिक फिटिंग आणि इतर आवश्यक कामे करण्यात आली. त्यामुळे शाळेचा परिसर आकर्षक आणि विद्यार्थ्यांना आनंदाने शिकण्यास प्रेरणा देणारा झाला आहे.

शाळेत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. शिष्यवृत्ती परीक्षेत दरवर्षी विद्यार्थी मेरिटमध्ये स्थान मिळवत आहेत. विद्यार्थ्यांना व्यवहारातील ज्ञान मिळावे यासाठी मार्केट डे आणि आनंद मेळावा आयोजित केला जातो. वनभोजनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निसर्गाच्या सान्निध्यात अनुभवाधारित शिक्षण दिले जाते. वृक्षारोपण, शालेय परिसर स्वच्छता, स्वच्छता अभियान आणि लोकवर्गणी यांसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेम, स्वच्छतेची सवय आणि सामाजिक बांधिलकी निर्माण केली जात आहे.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी वक्तृत्व, चित्रकला, सांस्कृतिक, सामान्यज्ञान आणि निबंध अशा विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले जाते. शाळा स्तरावरही विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.क्रीडा क्षेत्रातही शाळेने चांगली कामगिरी केली असून विद्यार्थ्यांना विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते.



जुनापाणी गावातील सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये शाळेचा नियमित सहभाग असतो. वार्षिक स्नेहसंमेलन, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती यांसह विविध कार्यक्रमांमध्ये मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी सहभागी होतात. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संस्कार, सामाजिक जाणीव आणि नेतृत्वगुण विकसित होत आहेत.

शाळेच्या या परिवर्तनामागे मुख्याध्यापक प्रमोद संपतराव बोडखे यांचे नियोजन, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि विद्यार्थ्यांविषयीची आस्था महत्त्वाची ठरली आहे. केवळ प्रशासकीय जबाबदारी पार न पाडता विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे, पालकांशी संपर्क ठेवणे, ग्रामस्थांना शाळेशी जोडणे आणि शाळेच्या गुणवत्तेसाठी सातत्याने नवीन उपक्रम राबविणे, या त्यांच्या कार्यपद्धतीमुळे शाळेने मोठी झेप घेतली आहे.

काही वर्षांपूर्वी केंद्रातील शेवटच्या क्रमांकावर असलेली शाळा आज केंद्रात प्रथम क्रमांकावर पोहोचणे ही त्यांच्या नेतृत्वाची आणि संपूर्ण शाळा परिवाराच्या प्रयत्नांची मोठी पावती मानली जात आहे.

या यशासाठी ग्रामपंचायतीचे उपसरपंच उत्तमराव काळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश वाढवे, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, ग्रामस्थ आणि सर्व सहाय्यक शिक्षक यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने जुनापाणी शाळेची ही यशोगाथा विशेष प्रेरणादायी ठरत आहे. लोकसहभाग, माजी विद्यार्थ्यांचे योगदान, पालकांचा विश्वास आणि शिक्षकांचे समर्पित प्रयत्न यांच्या जोरावर ग्रामीण भागातील सरकारी शाळाही गुणवत्तेचे आदर्श केंद्र बनू शकते, हे जुनापाणी जिल्हा परिषद शाळेने सिद्ध करून दाखविले आहे.

दैनिक सिंहवाणी वृत्त



थोडक्यात

## ओबीसी जनगणनेकरिता सर्व शाखीय ओबीसी समाजाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जातनिहाय जनगणने करिता नागपूर येथे सर्व शाखीय ओबीसी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद केले आहे की जातनिहाय जनगणना का आवश्यक आहे व ती झाल्यानंतर त्याचे काय फायदे होतील. जर जातनिहाय जनगणना झाली नाही तर सर्व ओबीसी समाज रस्त्यावर उतरेल असा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी प्रामुख्याने समितीचे अध्यक्ष राजेश काकडे, जवाहर विद्यार्थी गृहाचे रमेश पिसे, बहुउद्देशीय तिरळे कुणबी संघाचे संस्थापक सुरेश गुडधे, रमेशचंद्र ठवळे, तिरळे कुणबी सेवा मंडळाचे पांडुरंग वाकडे, महादेव बोराडे, समाजाचे अध्यक्ष सुरेश कोंगे, श्रीधर नहाते, आम आदमी पक्षाचे गिरीश तितरमारे, व बहुसंख्येने सर्व ओबीसी बंद उपस्थित होते.

## शेतकरी संघर्ष कृती समितीचे जिल्हाधिकारी यांना शेतकऱ्यांच्या विविध मागण्याचे निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकतेच शेतकरी संघर्ष कृती समिती (बं. स )काटोल,जि. नागपूर महा.राज्यातर्फे जिल्हाधिकारी साहेब नागपूर यांना शेतकऱ्यांच्या विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले. त्यात शेतकऱ्यांच्या विविध मागण्या खालील प्रमाणे. संत्रा मोसंबीची फळगळ मोठ्या प्रमाणात सुरू आहे पंचनामा करून नुकसान भरपाई मिळावी. २०२५ च्या विमाधारक शेतकऱ्यांना विम्याची रक्कम त्वरित मिळावी. जंगली जनावरांपासून मोठ्या प्रमाणात पिकाची नुकसान होत आहे त्यावर कायमस्वरूपी उपाय योजना करावी. शेतकऱ्यांचा फेरफार जमीन मोजणी यांचा निपटारा वेळेच्या आत करावा. शेतकऱ्यांच्या शासनस्तरावर राजकीय व सर्विस वर्ग वगळून उर्वरित कर्जमाफी सरसकट करावी व अटी शर्ती त्यात नको व इतर मागण्या यावेळी समितीतर्फे मांडण्यात आल्या.

यावेळी समाजसेवक सुभाष नोरोलिया, प्रफुलजी जोशी, समितीचे अध्यक्ष बाबारावजी वाघमारे, उपप्राचार्य प्रा. रमेश येवले, विदर्भवादी नेते अरुण केदार, विदर्भ अध्यक्ष मुकेश मासूरकर, हरीश मानकर, सुवर्णाताई पवार, रामरावजी पाटील, गिरीश तितरमारे, विराआसचे शहर अध्यक्ष तारेश दुरुगकर, अमोल रडके, पुष्पाताई सावरकर, यमुनाताई पेरोडीया, वर्षा मोरे शेतकरी हा अनेक गंभीर अडचणीचा सामना करीत आहे.

शेतकऱ्यांच्या मूलभूत गरजेकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने शेतकरी हा आर्थिक व मानसिक संकटात सापडला आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्यामुळे त्यांच्या प्रश्नावर तातडीने ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. करिता शेतकऱ्यांच्या समस्या सोडविन्या करिता शासनाकडे पाठपुरावा करावा ही समितीची नम्र विनंती आहे व शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढावे निवेदन देते वेळी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## खरगे यांच्या कथित शुद्धीकरणाविरोधात संविधान चौकात आंदोलन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या हल्द्वानी येथील सभेनंतर सभास्थळाचे कथित शुद्धीकरण करण्यात आल्याच्या निषेधार्थ नागपूर शहर काँग्रेस अनुसूचित जाती विभागाच्या वतीने आज संविधान चौकात आंदोलन करण्यात आले. अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष भाऊराव कोकणे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात या प्रकाराचा तीव्र निषेध करण्यात आला. संबंधितांविरुद्ध अनुसूचित जाती- जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. संविधान चौकातील या आंदोलनात रत्नदीप रंगारी, नरेश खडसे, दिनेश वाघमारे, प्रमोद शिगणे, विवेक निकोसे, रोहीत यादव, रोहित बीनक, राहुल आसेकर, सुरेश नारनवरे, राजेंद्र शेंडे, प्रकाश फुके, प्रफुल्ल भाजे, बंडू वैद्य, अनिल रामटेके, जितेंद्र तागडे, निलेश पाटील, अभय ढाकणे, प्रमोद खोब्रागडे, संजय गजभिये, योगीता मोडक आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

## बोट बुडून २ जवान बेपत्ता

**यमुनानगर** : हरियाणातील यमुनानगर जिल्ह्यात हथिनीकुंड बॅरेजजवळ मंगळवारी संध्याकाळी यमुना नदीत लष्कराची बोट बुडाल्याने बेपत्ता झालेल्या दोन जवानांचा १५ तासांनंतरही शोध लागलेला नाही. मंगळवारी संध्याकाळी ५ वाजता सुरू झालेले शोधकार्य रात्रभर सुरू होते. हेलिकॉप्टरनेही पाळत ठेवण्यात आली. हरियाणा व्यतिरिक्त, यूपीच्या एसटीआरएफ टीम्सही शोधकार्यात सामील आहेत. स्थानिक पाणबुड्यांनाही कामाला लावले आहे. बॅरेजमधून बाहेर पडणाऱ्या पूर्व आणि पश्चिम यमुना कालव्याच्या किनाऱ्यांवर सर्चलाइट्सने पाळत ठेवण्यात आली. आज कालव्यांमधील पाणीपुरवठा कमी करून पुन्हा प्रयत्न केले जातील. लष्कराच्या वन पॅरा स्पेशल फोर्सच्या पूर बचाव दलाच्या सरावादरम्यान हा अपघात झाला होता.

# विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणातून स्वयंरोजगाराकडे वळावे !

### उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री इंद्रनील नाईक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती तरुणांना व्हावी आणि त्यातून त्यांनी रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, या उद्देशाने आयोजित प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगाराकडे वळावे, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले.



एमएसएमई व विकास कार्यालयाच्या वतीने सेंट्रल इंडिया कॉलेज ऑफ फार्मसी, लोणारा येथे आयोजित सहा दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात ते उद्घाटनपर भाषणात बोलत होते. यावेळी विधान परिषद सदस्य अभिजीत वंजारी, कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे उपायुक्त दत्तात्रय ठाकरे, वेलनेस फॉरएव्हरचे अशरफ बिराण, एमएसएमईचे उपायुक्त संचालक व्ही. आर. सिरसाट, उपसंचालक योगेंद्र बघेल, सहाय्यक संचालक मनीष झा, माजी मंत्री अनिस अहमद, नगरसेवक अतुल कोटेचा आदी उपस्थित होते.

राज्यमंत्री नाईक म्हणाले, शिक्षण हे जीवनातील महत्त्वाचे साधन असून विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण करूनच रोजगाराच्या क्षेत्रात प्रवेश करावा. विशेषतः मुलींनी स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी पुढाकार घ्यावा. त्यांच्याबाबत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होणे आवश्यक आहे.

तरुणांमध्ये बेरोजगारीबाबत चिंता असून, विद्यार्थ्यांच्या गरजा आणि अपेक्षा लक्षात घेऊन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्योग व स्वयंरोजगारासाठी शासनाच्या विविध योजनांमध्ये अनुदानाची तरतूद आहे. मात्र, या योजनांची पुरेशी माहिती नसल्यामुळे तरुण त्याकडे वळत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शासनाच्या योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

हिवाळी अधिवेशनाच्या काळात डिसेंबरमध्ये तरुणांसाठी जॉब फेअर आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही राज्यमंत्री नाईक यांनी दिली. एमएसएमई क्षेत्राचे महत्त्व अधोरेखित करताना या क्षेत्रामुळे उद्योगांची आर्थिक स्थिती उन्नत करण्यास मोठी मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विधान परिषद सदस्य अभिजीत वंजारी यांनी तरुणांमधील बेरोजगारीच्या प्रश्नावर चिंता व्यक्त करत, अशा प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल, असे सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी मंत्री अनिस अहमद यांनी केले. यावेळी आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कौशल्य विकास विभागाच्या प्रमाणपत्रांचे वितरणही त्यांच्या हस्ते करण्यात आले.

# मोवाड नगर परिषदेच्या विकासकामांची सखोल चौकशी करा !

## माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या पत्राची दखल, जिल्हा सह-आयुक्तांचे मुख्याधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

मोवाड नगर परिषद हद्दीत शासनाच्या विविध योजनांतर्गत सुरू असलेल्या विकासकामांमध्ये कथित गैरव्यवहार, निविदा प्रक्रियेत अनियमितता आणि निकृष्ट दर्जाचे बांधकाम होत असल्याच्या तक्रारींची आता प्रशासकीय पातळीवर सखोल चौकशी होणार आहे. राज्याचे माजी गृहमंत्री तथा ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत नागपूर जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे चौकशीची मागणी केली होती. या तक्रारीनंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगर परिषद प्रशासन शाखेने मोवाड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

अनिल देशमुख यांनी नुकतीच मोवाड येथे भेट देऊन नगर परिषद तसेच शासनाच्या विविध योजनांतर्गत सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली होती. यामध्ये सिमेंट रस्ते, मिनी स्टेडियम, शाळेच्या खोल्यांचे बांधकाम, बगीचा सौंदर्यीकरण यासह इतर कामांचा समावेश आहे. पाहणीदरम्यान स्थानिक नागरिकांनी विकासकामांच्या दर्जाबाबत तसेच निविदा प्रक्रियेबाबत अनेक गंभीर तक्रारी देशमुख यांच्यासमोर मांडल्या.

विकासकामांसाठी शासना कडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जात असताना प्रत्यक्ष कामांमध्ये अपेक्षित दर्जा राखला जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला. काही कामांमध्ये नियम व तांत्रिक निकषांकडे दुर्लक्ष होत असल्याचेही नागरिकांनी निदर्शनास आणून दिले. तसेच निविदा प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यात आली का, कामांचे अंदाजपत्रक व प्रत्यक्ष काम यामध्ये तफावत आहे का, याचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली.

या तक्रारींची दखल घेत देशमुख यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून मोवाड नगर परिषदेतील विकासकामांची गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत तांत्रिक तपासणी करण्याची मागणी केली.



शासकीय निधीचा योग्य वापर झाला आहे का, निविदा प्रक्रिया नियमांनुसार पार पडली आहे का आणि संबंधित कामे मंजूर अंदाजपत्रक व तांत्रिक निकषांनुसार झाली आहेत का, याची पडताळणी करण्याची मागणी पत्रातून करण्यात आली.

दरम्यान, जिल्हा सह-आयुक्त, नगर परिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांनी मोवाड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना अधिकृत पत्र पाठवून या प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत. गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत सुरू असलेल्या विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून तांत्रिक तपासणी करावी, निविदा प्रक्रियेतील कथित अनियमितता तसेच

> शासकीय निधी हा जनतेच्या विकासासाठी असतो, कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारासाठी नाही. मोवाडमधील निकृष्ट कामे आणि निविदांमधील गैरव्यवहार खपवून घेतला जाणार नाही. चौकशीअंती दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई होईपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील.
>
> **– अनिल देशमुख, माजी गृहमंत्री**

कामकाजातील इतर बाबींची चौकशी करावी आणि चौकशीनंतर वस्तुस्थितीदर्शक स्पष्ट अभिप्रायासह सविस्तर अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा, असे आदेश देण्यात आले आहेत.

या आदेशामुळे मोवाड नगर परिषदेतील विकासकामांच्या दर्जाबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांना आता प्रशासकीय चौकशीच्या माध्यमातून उत्तर मिळण्याची शक्यता आहे. चौकशीत नेमके काय निष्पन्न होते आणि संबंधित कामांमध्ये अनियमितता आढळते का, याकडे मोवाडकरांचे लक्ष लागले आहे.

## सामाजिक दुष्प्रवृत्तींविरोधात जनजागृतीसाठी 'पैगाम-ए-रहमत-ए-आलम' अभियानाचा विशेष कार्यक्रम रवीभवनात गुरुवारी

### आत्महत्या, स्त्री भ्रूणहत्या, अमली पदार्थांचा गैरवापर व पर्यावरण प्रदूषणावर होणार जनजागृती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

समाजात वाढत चाललेल्या विविध सामाजिक समस्यांविषयी जनजागृती निर्माण करून नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना वाढविण्याच्या उद्देशाने वहदत-ए-इस्लामी हिंद, नागपूर च्यावतीने 'पैगाम-ए-रहमत-ए-आलम' या अभियानातंर्गततर्गत विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम गुरुवारी. ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता. रवीभवन सभागृह, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे होणार असल्याचे संयोजक मोहम्मद इरशाद यांनी वहदत-ए-इस्लामी हिंद ही धार्मिक व सामाजिक संघटना असून, देशातील विविध घटकांपर्यंत धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून सकारात्मक संदेश पोहोचविण्याचे कार्य संघटनेतर्फे केले जाते. समाजातील विविध प्रश्नांकडे केवळ समस्या म्हणून न पाहता त्यावर जनजागृती, संवाद आणि सामाजिक सहभागाच्या माध्यमातून मार्ग काढण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येत आहे. चार गंभीर सामाजिक प्रश्नांवर विशेष लक्ष 'पैगाम-ए-रहमत-ए-आलम' अभियानाच्या माध्यमातून समाजासमोरील चार गंभीर प्रश्नांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यामध्ये आत्महत्या प्रतिबंध व जीवनाचे महत्त्व, स्त्री भ्रूणहत्या रोखणे, अमली पदार्थांच्या गैरवापराबाबत जनजागृती आणि पर्यावरण प्रदूषण रोखणे या विषयांचा समावेश आहे.

माणसाला स्वतःच्या हातांनी मारून देऊ नका, या संदेशातून मानवी जीवनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. कुटुंब, समाज आणि विविध सामाजिक संस्थांनी संवेदनशीलतेने पुढाकार घेतल्यास अनेक गंभीर सामाजिक समस्यांना आळा घालता येऊ शकतो, असा संदेश या अभियानातून देण्यात येत आहे. स्त्री भ्रूणहत्या हा केवळ एका कुटुंबाचा प्रश्न नसून समाजाच्या भवितव्याशी संबंधित गंभीर विषय आहे. त्याचप्रमाणे अमली पदार्थांच्या वाढत्या वापरामुळे तरुण पिढीच्या आयुष्यावर होणारे परिणाम लक्षात घेऊन त्याविरोधात व्यापक जनजागृतीची आवश्यकता आहे. पर्यावरणाचे संरक्षण हीदेखील प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असून, प्रदूषण कमी करण्यासाठी सामाजिक सहभाग वाढविण्याचा संदेश या अभियानातून देण्यात येणार आहे.

# सौरक्रांतीत नागपूर परिमंडळाची उत्तुंग भरारी: 'पीएम सूर्यघर योजने'त ओलांडला तब्बल ५०० मेगावॅटचा ऐतिहासिक टप्पा!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर व वर्धा जिल्ह्यांचा समावेश असलेल्या महावितरणच्या नागपूर परिमंडळातील वीज ग्राहकांनी सौरऊर्जेचा अंगीकार करत पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्यात संपूर्ण महाराष्ट्रात अव्वल स्थान पटकावले आहे. महावितरणचे नियोजनबद्ध कामकाज आणि वीज ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यांच्या जोरावर 'पीएम सूर्यघर मोफत बिजली योजने'अंतर्गत नागपूर परिमंडळाने मंगळवारी (दि. १ सप्टेंबर) तब्बल ५०० मेगावॅट स्थापित क्षमतेचा ऐतिहासिक टप्पा यशस्वीपणे ओलांडला आहे.



केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा 'पीएम सूर्यघर मोफत बिजली योजने'मुळे आज सर्वसामान्य नागरिक केवळ विजेचा उपभोग घेणारे ग्राहक न राहता, स्वतःच्या छतावरून वीजनिर्मिती करणारे आत्मनिर्भर ऊर्जादाते बनत आहेत. या योजनेअंतर्गत १ किलोवॅट ते ३ किलोवॅट किंवा त्याहून अधिक क्षमतेच्या सौर प्रकल्पांसाठी केंद्र सरकारतर्फे ३० हजार ते ७८ हजार रुपयांपर्यंतचे थेट आर्थिक सहाय्य ग्राहकांच्या बँक खात्यात दिले जात आहे. यात परिमंडळातील १ लाख १९ हजार २६७ ग्राहकांच्या बँक खात्यात तब्बल ९२७.८४ कोटी रुपयांचे अनुदान जमा झाले आहे. यात नागपूर जिल्ह्यातील ९८ हजार ३७१ ग्राहकांच्या बँक खात्यात तब्बल ७६६.६३ कोटी तर वर्धा जिल्ह्यातील २० हजार ८९६ ग्राहकांच्या खात्यात १६१.२१ कोटी जमा झाले आहेत.

याशिवाय राज्य शासनाच्या 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप' म्हणजेच 'स्मार्ट' योजने अंतर्गत ३० युनिटपर्यंत वीज वापर असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अत्यंत नाममात्र खर्चात १ किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प बसवता येत आहे. यामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांसाठी फक्त अडीच हजार रुपये, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील ग्राहकांसाठी केवळ ५ हजार रुपये, तर इतर मागासवर्गीय व सर्वसाधारण प्रवगार्साठी १० हजार रुपये इतकाच नाममात्र लाभार्थी हिस्सा निश्चित करण्यात आला आहे. या दोन्ही योजनांच्या दुहेरी लभामुळे अत्यंत माफक खर्चात सौर रुफ टॉपची उभारणी करून वीजबिल पूर्णपणे शून्य होत असून, तयार झालेली अतिरिक्त वीज महावितरणला नेट मोजणी द्वारे विकून ग्राहकांना दरमहा हक्काचे आर्थिक उत्पन्न मिळवण्याचा नवा मार्गही उपलब्ध झाला आहे. सौरऊर्जेच्या या मोहिमेत नागपूर परिमंडळातील तब्बल १ लाख ३१ हजार २४९ ग्राहकांनी ५०१.०१ मेगावॅट स्थापित ऊर्जा निर्मितीचा टप्पा गाठत संपूर्ण महाराष्ट्रात अव्वल स्थान टिकवून ठेवले आहे. यात नागपूर जिल्ह्यातील १ लाख ८ हजार ८२० ग्राहकांनी ४१८.६३ मेगावॅट, तर वर्धा जिल्ह्यातील २२ हजार ८४२ ग्राहकांनी ८२.३८ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीची क्षमता गाठली आहे. पारंपरिक वीजनिर्मितीमुळे होणारे प्रदूषण थांबवून स्वच्छ आणि हरित ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी नागपूर परिमंडळातील वीज ग्राहकांनी दाखवलेली ही जागरूकता संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे. या अभूतपूर्व यशामुळे हजारो कुटुंबांच्या घरातील अंधार दूर होऊन वीजबिल शून्य तर झालेच आहे, शिवाय महावितरणच्या यंत्रणेवरील पारंपरिक विजेचा ताणही लक्षणीयरीत्या कमी झाला आहे.

वाढत्या महागाईच्या काळात दरमहा येणाऱ्या वीजबिलाच्या कायमच्या त्रासातून मुक्ती मिळवण्यासाठी आणि आपले कुटुंब स्वयंपूर्ण करण्यासाठी ही अत्यंत मोलाची सुवर्णसंधी आहे. त्यामुळे अद्याप या योजनेचा लाभ न घेतलेल्या नागरिकांनी मुळीच विलंब न करता तात्काळ 'पीएम सूर्यघर'च्या अधिकृत पोर्टलवर नोंदणी करावी, महावितरणच्या सुलभ प्रक्रियेचा फायदा घ्यावा आणि हरित ऊर्जेच्या या महायज्ञात सक्रिय सहभागी होऊन आपल्या घराला प्रकाशमय व चिंतामुक्त करावे, असे आग्रही आवाहन महावितरण प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

थोडक्यात

# किराणा दुकानात चोरी करणारे विधिसंघर्षग्रस्त बालक ताब्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

शहरातील इतवारी पेठ येथील मुख्य बाजारपेठेत असलेल्या किराणा दुकानाचे शटर फोडून नगदी व चांदीचा ऐवज लंपास करणाऱ्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात उमरेड पोलिसांना यश आले आहे. तांत्रिक पुरावे आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्यात सहभागी असलेल्या एका विधिसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून १ हजार ८०० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. अनिलकुमार टिकमदास गोविंदाणी यांचे इतवारी पेठ येथील मुख्य बाजारपेठेत अनिल ट्रेडर्स नावाचे किराणा दुकान आहे. ५ जुलै २०२६ रोजी रात्री ९ वाजल्यापासून ते ६ जुलै रोजी पहाटे ४.४५ वाजताच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटर तोडून दुकानातील रोख रक्कम तसेच चांदीचा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी उमरेड पोलिस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३३१ (४), ३०५ (अ) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी तांत्रिक पुरावे तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपासाची चक्रे फिरविली. त्यातून सदर चोरीमध्ये एका विधिसंघर्षग्रस्त बालकाचा तसेच त्याच्या साथीदारांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर २ सप्टेंबर रोजी पोलिसांनी संबंधित विधिसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपल्या साथीदारांसह दुकानात चोरी केल्याची माहिती दिली. चोरीतील त्याच्या वाट्याला आलेल्या रकमेपैकी शिल्लक असलेली १ हजार ८०० रुपयांची रोख रक्कम पोलिसांनी जप्त केली आहे. या कारवाईमुळे बाजारपेठेतील चोरीच्या प्रकरणाचा तपास पुढे सरकला असून, अन्य सहभागींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकारी हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के तसेच सहायक पोलीस अधीक्षक व उमरेड उपविभागीय पोलीस अधिकारी मयंक माधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धनाजी जळक, पोउपनि संदीप सडमेक, तसेच पोलीस अंमलदार राधेश्याम कांबळे, पंकज बट्टे, मंगेश निंबार्ते, रमेश टेकाम, चेतन माहुलकर आणि आकाश गणवीर यांनी केली.

# हिंदी माध्यमाच्या पात्र उमेदवारांवरील अन्याय दूर करा!

## पवित्र पोर्टलवरील पात्रता त्रुटी तातडीने दुरुस्त करण्याची मागणी; पालकमंत्री इंद्रनील नाईक व खासदार राजेंद्र जैन यांना निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**

शिक्षक भरती प्रक्रियेत हिंदी माध्यमाच्या पदांसाठी अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत पवित्र पोर्टलवर निर्माण झालेल्या त्रुटींमुळे अनेक उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर हिंदी माध्यमातील उमेदवारांनी संबंधित यंत्रणेकडे निवेदन सादवून पात्रता निकषांची फेरतपासणी करून निवड प्रक्रियेत पात्र उमेदवारांना न्याय देण्याची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, हिंदी माध्यमाच्या पदांसाठी अर्ज करताना काही उमेदवारांच्या D.Ed./B.Ed. तसेच माध्यमनिहाय शैक्षणिक पात्रतेची नोंद व पडताळणी करताना पवित्र पोर्टलवर तांत्रिक अथवा प्रक्रियात्मक अडचणी निर्माण झाल्या आहेत. विशेषतः मराठी माध्यमातून इयत्ता दहावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर हिंदी माध्यमातून ऊएर्. पूर्ण केलेल्या उमेदवारांच्या पात्रतेचा योग्य पद्धतीने विचार होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**माध्यमनिहाय समान निकष लागू करण्याची मागणी**

इतर माध्यमांच्या उमेदवारांसाठी माध्यमनिहाय पात्रतेचे निकष लागू केले जात असतील, तर हिंदी माध्यमाच्या उमेदवारांसाठीही स्पष्ट, समान आणि पारदर्शक निकष लागू करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. पोर्टलवर पात्रता निश्चित करताना झालेल्या त्रुटींची पुनर्तपासणी करून पात्र उमेदवारांना निवड प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी द्यावी, असेही निवेदनात म्हटले आहे.

**पात्र उमेदवारांना १०० टक्के संधी द्या!**

हिंदी माध्यमाच्या शिक्षक पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची इयत्ता १० वीचे माध्यम, ऊएर्./इ.एर्.चे माध्यम आणि शिक्षक भरतीसाठी आवश्यक इतर पात्रता यांची सखोल तपासणी करून पात्र उमेदवारांची सुधारित यादी तयार करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. चुकीच्या अथवा नियमबाह्य पद्धतीने अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांची फेरतपासणी करून त्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. दरम्यान, हिंदी माध्यमाच्या उपलब्ध शिक्षक पदांवर पात्र उमेदवारांना संधी मिळावी आणि निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडावी, यासाठी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांच्याकडे निवेदन सादविण्यात आले. निवेदनाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांनाही देण्यात आली आहे. यासोबतच पालकमंत्री इंद्रनील नाईक आणि खासदार राजेंद्र जैन यांनाही उमेदवारांनी निवेदन देऊन संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली. यावेळी दोन्ही लोकप्रतिनिधींनी उमेदवारांचे म्हणणे ऐकून घेत हिंदी माध्यमातील पात्र उमेदवारांवरील अन्याय दूर करण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. निवेदनावर हिंदी माध्यमातील अनेक पात्र उमेदवारांच्या स्वाक्षऱ्या असून, पवित्र पोर्टलवरील पात्रता त्रुटी तातडीने दूर करून सुधारित निवड यादी जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# मनपाच्या आरोग्य विभागाकडून शहरातील ६६२ नोंदणीकृत रुग्णालयांची तपासणी मोहीम

## रुग्णांना दर्जेदार व सुरक्षित आरोग्यसेवा मिळावी यासाठी मनपाचा पुढाकार, रुग्णालय तपासणी मोहिमेला वेग, आतापर्यंत २११ रुग्णालयांची तपासणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शहरातील रुग्णालयांमध्ये नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित आणि नियमबद्ध आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरातील सर्व ६६२ नोंदणीकृत रुग्णालयांची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

या तपासणी मोहिमेदरम्यान रुग्णालयातील उपलब्ध खाटांची संख्या, अग्निसुरक्षा व्यवस्था, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन, तसेच रुग्ण हक्कांचा चार्ट दर्शनी भागात लावण्यात आला आहे किंवा नाही,उपचारावरील खर्चा संबंदी दर फलक याची तपासणी करण्यात येत आहे. तसेच, संबंधित रुग्णालयांनी महाराष्ट्र नर्सिंग होम नोंदणी अधिनियम व संबंधित नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तपासणीदरम्यान आढळून येणाऱ्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संबंधित रुग्णालयांना आवश्यक त्या सूचनेसह नोटीस देण्यात येत आहेत.

मनपा आरोग्य विभागामार्फत मनपाच्या शहरातील १८ नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णालयांची तपासणी राबविण्यात येत असलेल्या तपासणी मोहिमेंतर्गत आतापर्यंत २११ रुग्णालयांची तपासणी पूर्ण करण्यात आली असून, नियमांचे पालन न करणाऱ्या अथवा त्रुटी आढळून आलेल्या रुग्णालयांना नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच उर्वरित नोंदणीकृत रुग्णालयांचीही दैनंदिन तपासणी करण्यात येत आहे.

ही मोहीम नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे यांच्या आदेशानुसार राबविण्यात येत असून, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीच्या सभापती मनिषा अतकरे, आयुक्त डॉ. विपीन इटनकर आणि अतिरिक्त आयुक्त अंकित यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार आणि साथरोग अधिकारी डॉ. गोवर्धन नवखरे यांच्या देखरेखीखाली राबविण्यात येत आहे. रुग्णांच्या सुरक्षिततेला आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेला सर्वोच्च प्राधान्य देत ही तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन किंवा गंभीर त्रुटी आढळून आल्यास संबंधित रुग्णालयांवर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती मनपा आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

आज वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीच्या सभापती मनिषा अतकरे यांच्या मार्गदर्शनाखाली दळवी स्मारक रुग्णालय व अनुसंधान केंद्र (धर्मादाय रुग्णालय), श्रेयस हॉस्पिटल आणि तारांगण हॉस्पिटल येथे भेट देऊन रुग्णांसाठी उपलब्ध सोयी-सुविधा तसेच आरोग्यसेवेशी संबंधित व्यवस्थेची पाहणी करण्यात आली.

# 'भटके-विमुक्त दिवस-२०२६' उत्साहात साजरा, विविध उपक्रमांचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** इतर मागास बहुजन कल्याण विभाग, नागपूर यांच्या वतीने नंदनवन परिसरातील जगनाडे चौकाजवळील आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे भटके-विमुक्त दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. आपला इतिहास - आपली वाटचाल या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट भटके-विमुक्त समाजाचा संघर्ष, वारसा आणि सामाजिक योगदानाची जाणीव करून देणे, तसेच शासकीय कल्याणकारी योजनांची माहिती समाजातील घटकांपर्यंत पोहोचवणे हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोवारी समाज सनियंत्रण समितीचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) कैलास राऊत होते, तर प्रमुख वक्ते म्हणून गोंदियाचे प्रशांत बोरसे उपस्थित होते. बोरसे यांनी भटके-विमुक्त समाजाचा इतिहास, सद्यःस्थिती आणि भविष्यातील दिशा यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे नागपूर येथील सहाय्यक संचालक रोहन कांबळे यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांनी शिक्षण, कौशल्य विकास आणि शासकीय योजनांचा लाभ घेत विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आडे यांनी केले. या वेळी आपला इतिहास आपली वाटचाल हा माहितीपट दाखवण्यात आला, तसेच परस्परसंवादी पॅनलच्या माध्यमातून समाज आणि शासकीय योजनांविषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थी आणि तरुणांसाठी आयोजित करिअर कॅप्सूल या विशेष उपक्रमात नागपूरचे प्रशिक्षणार्थी उपजिल्हाधिकारी अमित लोकरे आणि मानतेश पाटील यांनी स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधींविषयी मार्गदर्शन केले. माझे स्वप्न २०३० या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भविष्यातील ध्येयांवर विचार मांडण्याची संधी मिळाली. याशिवाय भटके-विमुक्त प्रेरणा सन्मान, सामूहिक संकल्प आणि आगामी ३० दिवसांचा कृती आराखडा या उपक्रमांतून सर्वांगीण विकासाचा संदेश देण्यात आला.

# 'जाते-जाते नेत्रदान'चा संदेश देत उमरेडमध्ये जनजागृती रॅली

## विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग, घोषणांनी दुमदुमला बुधवारी परिसर




**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

मरणोत्तर नेत्रदानाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने नेत्रसंपदा उमरेड, सक्षम केंद्र उमरेड व उमरेड युथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या येथे राष्ट्रीय नेत्रदान जनजागृती पंधरवड्यानिमित्त नेत्रदान जनजागरण रॅलीचे आयोजन करण्यात आले. नगर परिषद बुधवारी प्राथमिक शाळेच्या प्रागणातून बुधवारी परिसरात नेत्रदान जनजागृती रॅलीची सुरवात शिक्षण सभापती वैशाली बांदरे व नरेंद्र गडबोरीकर व नेत्रसंपदा उमरेडचे संयोजक डॉ. शशिकांत जयस्वाल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ करण्यात आले. उमरेड शहरात आजवर २५० हून अधिक नेत्रदान झाले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने रॅलीला विशेष आकर्षण प्राप्त झाले.

'जिते-जिते रक्तदान, जाते-जाते नेत्रदान', 'नेत्रदान ही तर आहे पुण्याची खान', 'आयुष्यात ज्यांचे अंधारले मन, उजळले ते मन करावे नेत्रदान' अशा प्रभावी घोषणांनी संपूर्ण बुधवारी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी हातात नेत्रदान जनजागृतीपर फलक घेत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. रणधीरसिंह भदोरिया महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना चमूचे विद्यार्थी, स्व. देवरावजी इटनकर पब्लिक स्कूलच्या एनसीसी पथकासह, पब्लिक हायस्कूल, जीवन विकास विद्यालय, जीवन विकास वनिता विद्यालय(स्काऊट गाईड),न्यू आयडियल गर्ल्स हायस्कूल, अशोक कन्या विद्यालय, ओम विद्यानिकेतन स्कूल,सिल्वर इंटरनॅशनल स्कूल,आदी शाळांचे विद्यार्थी बँड पथकांसह रॅलीत सहभागी झाले.

रॅलीचा समारोप नगर परिषद बुधवारी प्राथमिक शाळेच्या परिसरात करण्यात आला. मरणोत्तर नेत्रदानामुळे दोन व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश निर्माण होऊ शकतो, हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. नेत्रदानाबाबत असलेले गैरसमज दूर करून अधिकाधिक नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. रॅलीमध्ये डॉ. शशिकांत जयस्वाल, अनिलकुमार गोविंदानी, कृष्णा हेडाऊ, राजकुमार पांडे, राम तांबडे, अरविंद हजारे, अल्का रेवतकर, आशा मुंधडा, डॉ. सोनल लुटे, मनोहर तोंडे, मनिष शिंगणे, संजय बैस, प्रकाश जुमडे, दत्तात्रय तोटवार, सचिन कुहीकर, राजेश जिकार, लीना झाडे, रितेश राऊत, सुभाष गुप्ता, मांगो लेंडे,कंठीराम गिल्लुरकर, पुष्पा गिल्लुरकर, वंदना हुमणे,विलास रायपूरकर, रमाकांत कागदेलवार सौरभ भिवगडे, भावेश मोहतकर, स्वप्नील गवळी, विशाल बावणे, समर भगत, हितेश गडबोरीकर, मनीष सहारकर, राजू चाचरकर तसेच विविध शाळांचे शिक्षकवृंद यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन व आभार अनिलकुमार गोविंदानी यांनी मानले.

# महाराष्ट्राच्या ऊर्जा विभागाच्या दालनाला सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण स्टॉलचा पुरस्कार

## नवी दिल्लीतील जागतिक परिषदेमध्ये ऊर्जा प्रदर्शनीला मोठा प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नवी दिल्ली येथील 'भारत इलेक्ट्रिसिटी, पॉवरजेन इंडिया आणि इंडियन युटिलिटी वीक २०२६' या जागतिक परिषदेच्या ऊर्जा प्रदर्शनीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाच्या दालनाला सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण स्टॉल डिझाइनच्या पुरस्काराने बुधवारी (दि. २) गौरविण्यात आले. केंद्रीय विद्युत आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्याहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नवी दिल्ली येथील यशोभूमिमध्ये येथे १ ते ३ सप्टेंबरपर्यंत आयोजित 'भारत इलेक्ट्रिसिटी, पॉवरजेन इंडिया आणि इंडियन युटिलिटी वीक २०२६' परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्य 'फोकस स्टेट' म्हणून सहभागी झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात आणि ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या नेतृत्वात राज्याने ऊर्जा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचे सादरीकरण या परिषदेतील लक्षवेधक प्रदर्शनीच्या माध्यमातून करण्यात येत आहे व त्यास मोठा प्रतिसाद मिळत आहे. महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महाऊर्जाचे महासंचालक ओमप्रकाश बकोरिया, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विक्रम कुमार यांच्या मार्गदर्शनात चारही संस्थांचे संयुक्त प्रदर्शनी दालन या परिषदेत उभारण्यात आले आहे. महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक गडकिल्ल्यांची ओळख तसेच हरित ऊर्जेतील प्रवासाचा संगम साधून या दालनाची रचना करण्यात आली आहे. तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे राज्याच्या ऊर्जा क्षेत्रातील सकारात्मक बदलाचे चित्र आणि तंत्रज्ञानावर आधारित हरित ऊर्जेच्या भविष्याकडे होणारा प्रवास दालनातून दाखविण्यात येत आहे.

ऊर्जा विभागाच्या या दालनाचे प्रमुख आकर्षण असलेल्या 'इंटरअॅक्टिव्ह टच वॉल'ला मोठा प्रतिसाद मिळाला. महावितरण, महानिर्मिती, महापारेषण आणि महाऊर्जा यांच्या प्रमुख योजना, प्रकल्प आणि यशाची माहिती या डिजिटल माध्यमातून देण्यात आली. तसेच 'इंटरअॅक्टिव्ह स्क्रीन'वर ऑडिओ-व्हिज्युअल सादरीकरणाच्या माध्यमातून या चारही संस्थांचे यश आणि विविध उपक्रम डिजिटल स्वरूपात दाखवण्यात आले. यासह 'इमर्सिव्ह व्हर्च्युअल रिअॅलिटी झोन'मधून घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्प, मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०, मागेल त्याला सौर कृषिपंप आणि सिन्नर सौर ऊर्जा प्रकल्पामध्ये व्हर्च्युअली फेरफटका मारता आला.

या दालनात 'सेल्फी बूथ' देखील आकर्षण ठरले आहे. इंटरअॅक्टिव्ह तंत्रज्ञान, व्हर्च्युअल अनुभव, डिजिटल माहिती आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीवर आधारित रचना यामुळे हे दालन माहितीपूर्ण, नाविन्यपूर्ण ठरले आणि परिषदेतील सर्वोत्कृष्ट नाविन्यपूर्ण स्टॉल डिझाईनच्या पुरस्काराने गौरविण्यात आले.

# निसर्गाशी नाते जोडण्यासाठी 'जंगल कॅम्प'चे आयोजन

## ब. रु. हायस्कूलच्या स्काऊट-गाईड विभागाचा अनोखा उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

बनारसीदास रुईया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, काटोल येथील स्काऊट-गाईड विभागातर्फे वर्धा जिल्ह्यातील बोर अभयारण्य परिसरातील ढगा भवन येथे एकदिवसीय 'जंगल कॅम्प'चे मंगळवारी यशस्वी आयोजन करण्यात आले. पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासोबतच विद्यार्थ्यांचे निसगार्शी नाते जोडण्यासाठी आयोजित या उपक्रमांतर्गत प्लास्टिक मुक्त जंगल अभियान, वृक्षारोपण तसेच झाडांना राखी बांधून रक्षाबंधन आदी उपक्रम यावेळी राबविण्यात आले.

शाळेतील स्काऊट गाईड विभाग प्रमुख सुवर्णा ठाकरे यांच्या पुढाकाराने आयोजित या कॅम्पमध्ये स्काऊट गाईड विभागाच्या प्रभात शाखा प्रमुख हर्षाली थोटे, गाईडर निरुपमा लांडे, ज्येष्ठ क्रीडा शिक्षक धीरज ढोले, भास्कर शिरसाट, कौस्तुभ पवार आदी शिक्षकांसह शाळेतील स्काऊट गाईडचे पन्नास विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

कॅम्प दरम्यान शाळेच्या वतीने शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्थानिकांच्या मदतीने जंगल परिसरात आंबा, वड, पिंपळ, औदुंबर, आवळा अशी विविध झाडे लावली. तसेच शाळेद्वारे राबविण्यात येणाऱ्या 'स्वच्छता मॉनिटर' उपक्रमांतर्गत ढगा भवन परिसरात विद्यार्थ्यांनी स्वच्छता दूत बनत प्लास्टिक मुक्त जंगल अभियान राबवित वन्य प्राण्यांना व निसर्गाला हानिकारक अशा प्लास्टिकचा कचरा वेचला.

त्याचप्रमाणे पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी व निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी गाईडच्या विद्यार्थिनींनी परिसरातील झाडांना राखी बांधत रक्षाबंधन साजरे केले. 'दया कर दान भक्ती का' हे स्काऊट गाईडचे प्रार्थना गीत म्हणत सुरू करण्यात आलेल्या मनोरंजनपर कार्यक्रमात विदयार्थ्यांनी विविध गीत, नृत्य



व नकला सादर केल्या. तसेच जंगल व पाण्यातून वाट काढत लगतच्या टेकडीवर जात ट्रेकिंगचा आनंद घेतला आणि जंगलालगत राहणाऱ्या स्थानिकांशी देखील विद्यार्थ्यांनी यावेळी संवाद साधला व वन्य प्राण्यांबद्दलचे त्यांचे अंगावर शहारे आणणारे अनुभव ऐकून घेतले.

अशाप्रकारे विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरलेल्या या कॅम्पचे यशस्वी आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कॅम्पला निघताना शाळेचे उपमुख्याध्यापक हिरामण सोमकुवर व पर्यवेक्षक अजय खडसे यांच्यासह सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेतील शिपाई गोपाल तांबूस्कर व लता वानखेडे यांनी देखील मोलाचे सहकार्य केले.

थोडक्यात

## विनयभंगाच्या गुन्ह्यात आरोपी आशुतोष डोंगरेला एका वर्षाचा सश्रम कारावास, रामटेक न्यायालयाचा निर्णय

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

विनयभंगाच्या गंभीर गुन्ह्यात आरोपी आशुतोष राजू डोंगरे (रा. रामटेक) याला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती शिरवळकर यांच्या न्यायालयाने दोषी ठरवत एक वर्ष सश्रम कारावास आणि २५,००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास आरोपीला अतिरिक्त एक महिना साध्या कैदेची शिक्षा भोगावी लागणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी आशुतोष डोंगरे याच्यावर सन २०२२ मध्ये भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ आणि ३५४ (अ) अंतर्गत विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची सुनावणी रामटेक येथील न्यायालयात पार पडली. सादर केलेले पुरावे आणि साक्षीदारांची साक्ष ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत दिनांक २ सप्टेंबर रोजी ही शिक्षा सुनावली. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील मोहन भांडेकर यांनी काम पाहिले, तर पैरवी पोलीस शिपाई शेषराज उके यांनी न्यायालयात सहकार्य केले.

## पर्यावरणपूरक राखी स्पर्धेत १७५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

### राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

नुकतीच राष्ट्रीय आदर्श विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रामटेक येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारी पर्यावरणपूरक राखी स्पर्धा उत्साहात पार पडली. शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र चन्ने व पर्यवेक्षक शैलेश परमार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत इयत्ता ५ वी ते १२ वीच्या तब्बल १७५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सचिव मयंकजी देशमुख व संस्थेचे सदस्य घनश्यामजी बर्वे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून आकर्षक व नाविन्यपूर्ण राख्या तयार केल्या. स्पर्धेत गट १ (इयत्ता ५ वी ते ७ वी) आणि गट २ (इयत्ता ८ वी ते १२ वी) अशा दोन गटांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात आला. दोन्ही गटांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण राहुल जोहरे सर यांनी केले.

यावेळी संस्थेचे सचिव. मयंक देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून पर्यावरणपूरक राखी तयार केल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. तसेच पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले. मुख्याध्यापक रवींद्र चन्ने सर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन करत सर्जनशीलतेसोबत पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण होणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन विठ्ठल वाघाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अरविंद कोहळे सर यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अशोक खंडाईत, नरेश रुखमोडे, वेदप्रकाश मोकद्दम, ज्येष्ठ शिक्षिका संध्या महाजन, संगीता नागोसे, तारा दलाल व रोशनी खागर तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. परंपरेसोबत पर्यावरणाची जपणूक, हा संदेश देणारी ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारी आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करणारी ठरली.

## पीटी क्लास दरम्यान फायर अकॅडमीच्या दोन प्रशिक्षणार्थींना सर्पदंश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कळमना अग्निशमन केंद्र परिसरात स्टेट फायर अकॅडमीचे प्रशिक्षण केंद्र आहे. या केंद्रामध्ये सुमारे ५४ प्रशिक्षणार्थी फायरमन कोर्सचे प्रशिक्षण घेत आहेत. साडेसात वाजता पी टी क्लासच्या दरम्यान दोन प्रशिक्षणार्थींना पायावर काहीतरी चावण्याचा भास झाल्याने त्यांना तात्काळ गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले. पायावरील दंशा चिन्ह व शरीरातल्या सिम्प्टम्सवरून डॉक्टरांनी विषारी सापाचे दंश असण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यातील यश साहेबराव इडेकर (राहणार लातूर) या प्रशिक्षणार्थीला अँटी-वेनम देऊन आय. सी. यु. मध्ये उपचार सुरू केलेले आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. अक्षय प्रकाश हेलिंगे (राहणार चाळीसगाव जिल्हा जळगाव) या प्रशिक्षणार्थीला सिम्टम्स दिसून न आल्याने साध्या वार्डमध्ये वैद्यकीय निगराणीमध्ये ठेवण्यात आलेले आहे. माननीय आयुक्त तथा मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी जीएमसी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींची भेट घेऊन योग्य वैद्यकीय उपचार मिळत असल्याची खात्री केली. कळमना अग्निशमन केंद्राचे केंद्र अधिकारी अकलिम शेख व इतर कर्मचाऱ्यांना रुग्णालयात तैनात ठेवण्यात आले आहे.

## खुले भूखंडाच्या थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी जप्तीची कारवाई

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महानगरपालिका आयुक्त यांच्या निर्देशानुसार धरमपेठ झोन अंतर्गत मालमत्ता कर वसुलीची प्रभावी कार्यवाही सुरू असून, थकीत मालमत्ता कर असलेल्या खुले भूखंडधारकांविरुद्ध आज दिनांक २ सप्टेंबर रोजी वॉरंट बजावून जप्तीची कारवाई करण्यात आली. धरमपेठ झोन अंतर्गत वार्ड क्र. ६८, हजारीपहाड येथिल घर क्र. ५४०/अ/२५६ ओम कॉ. हाऊ. सोसायटी भुखंड धारक सय्यद अहमद सय्यद अजगर अली यांच्या थकीत मालमत्ता कर १५,५५,७१२/- रू. असल्यामुळे त्यांचा भुखंड जप्त करण्यात आला. वरील जप्त केलेल्या मालमत्तांची नियमानुसार पुढील कार्यवाही करून लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे, जेणेकरून महानगरपालिकेची थकीत मालमत्ता कराची रक्कम वसूल करता येईल.

# राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पाहुण्यांची मारबत महोत्सवाला हजेरी

### स्थायी समिती सभापती यांनी घेतला मनपाच्या मारबत महोत्सवाच्या पूर्वतयारीचा आढावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या पारंपारिक व ऐतिहासिक ओळख असणाऱ्या 'मारबत महोत्सवाच्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकाद्वारे आवश्यक नियोजन व उपाययोजनाच्या पूर्व तयारीच्या संदर्भात स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांच्या अध्यक्षतेत बुधवारी (ता.२) डॉ. पंजाबराब देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात विशेष बैठक पार पडली.

बैठकीला सत्तापक्ष नेते नरेंद्र(बाल्या) बोरकर, आभा पांडे, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, पोलीस उपायुक्त (वाहतूक) आदित्य मिरखेलकर, नगरसेवक सुधीर (बंडू) राऊत, महिला व बालकल्याण विशेष समिती सभापती सारिका नांदुरकर, नगरसेविका वैशाली उदापुरकर, रामा उईके, अभिरुची राजगिरे, नगरसेवक तुषार लारोकर, रेखा निमजे, नगरसेविका चेतना निमजे, उमा देशमुख, कल्पना शर्मा, रामभाऊ आंबुलकर, संजय अवचट, मनपाचे उपायुक्त राजेश भगत, उपायुक्त मंगेश खवले, यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी व विवेक रानडे प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठकीत स्थायी समिती सभापती शिवानी दाणी वखरे यांनी सांगितले की, १४५ वर्षांचे ऐतिहासिक महत्त्व मारबत उत्सवाला प्राप्त आहे. यंदाच्या मारबत महोत्सवात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातनाम व्यक्ती व सिनेअभिनेता यांची उपस्थिती लाभणार आहे. यासोबतच राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते ६ सप्टेंबर रोजी काळी व पिवळी मारबत यांची विधिवत पूजा केली जाणार आहे. तसेच हेरीटेज वॉक देखील आयोजित केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

विशेष म्हणजे, मारबत च्या मूळ संकल्पनेला बाधा न पोहोचविता या महोत्सवाला जागतिक पातळीवर घेऊन जाण्याचा हा प्रयत्न आहे. नागपूरची ऐतिहासिक संस्कृती जपणाऱ्या या महोत्सवात नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग राहावा आणि शहराचे वैभव जगासमोर यावे, यासाठी मनपाद्वारे मारबत महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. 'ईडा पिडा घेऊन जा गे मारबत' असे बोधचिन्ह, मोमेंटो, भेट वस्तू महोत्सवात येणाऱ्या नागरिकांना देण्याचा मानस असून, या भेटवस्तू प्राप्त करण्यासाठी 'बुक माय शो' या संकेतस्थळावर नोंदणी करायची आहे.

पोलीस विभाग, मनपा प्रशासन व संबंधित इतर विभागांनी सुनियोजित व्यवस्था करण्याचे निर्देश शिवानी दाणी वखरे यांनी दिले. सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी आयोजनासाठी स्थानिक नगरसेवकांच्या सूचनांचा विचार करण्यात यावा अशी सूचना केली. तर मिरवणूकीच्या मार्गावरील विजेच्या तारा व इतर अडथळे दूर करण्याच्या सूचना सुधीर राऊत व आभा पांडे यांनी यावेळी दिले.

# सालेकसा तालुक्यात कृषी महाविद्यालय स्थापनेसाठी निवेदन

### विद्यार्थ्यांच्या शिक्षणासह शेतकरी व रोजगार क्षेत्रालाही मिळणार चालना

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**



सालेकसा तालुक्यात कृषी महाविद्यालयाची स्थापना करण्यात यावी, या महत्त्वपूर्ण मागणीसाठी दिनांक २ सप्टेंबर २०२६ रोजी गोंदिया जिल्ह्यातील मान्यवर नेत्यांना निवेदन देण्यात आले. गोंदिया जिल्ह्याचे विकासपुरुष, खासदार प्रफुल्लभाई पटेल साहेब यांच्या रामनगर, गोंदिया येथील निवासस्थानी गोंदिया जिल्ह्याचे लोकप्रिय नेते सन्माननीय खासदार राजेंद्रजी जैन तसेच गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्यमंत्री सन्माननीय इंद्रनीलजी नाईक साहेब यांना सालेकसा तालुक्यात कृषी महाविद्यालय सुरू करण्याबाबत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सालेकसा तालुक्यात शेती हा प्रमुख व्यवसाय असून तालुक्यातील मोठा वर्ग शेतीवर अवलंबून आहे. मात्र कृषी शिक्षणाची आवड असलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी इतर जिल्ह्यांमध्ये जावे लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते तसेच त्यांच्या पालकांवर आर्थिक भारही पडतो.

सालेकसा तालुक्यात कृषी महाविद्यालयाची स्थापना झाल्यास विद्यार्थ्यांना बी.एस्सी. कृषी तसेच कृषी विषयक पदविका अभ्यासक्रमांचे शिक्षण स्थानिक पातळीवर उपलब्ध होऊ शकेल. कृषी क्षेत्रात सातत्याने नवीन संशोधन आणि आधुनिक प्रयोग होत असून त्याचा लाभ तालुक्यातील विद्यार्थी, शेतकरी आणि कृषी क्षेत्राशी संबंधित नागरिकांना मिळणे आवश्यक आहे.

कृषी महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे सालेकसा तालुक्याचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत होईल, तसेच स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या आणि इतर विविध संधी उपलब्ध होतील. याशिवाय तालुक्यातील शेतकरी वर्गाला आधुनिक तंत्रज्ञान, नवीन संशोधनात्मक माहिती आणि प्रगत शेतीविषयक मार्गदर्शन मिळण्यास मोठी मदत होणार आहे. यावेळी खासदार राजेंद्रजी जैन आणि पालकमंत्री इंद्रनीलजी नाईक यांनी हा विषय खासदार प्रफुल्लभाई पटेल यांच्या निदर्शनास आणून देऊन, या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देत राज्य शासनाच्या संबंधित विभागाकडे सालेकसा तालुक्यात कृषी महाविद्यालय स्थापनेसाठी योग्य पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी गोंदिया जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा सभापती (शिक्षण व आरोग्य) सुरेशभाऊ हर्षेजी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रेमकुमारजी रहांगडाले उपस्थित होते.

सदर निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सालेकसा शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, युवा कार्यकर्ते रिषी बैस आणि संजय ब्राह्मणकर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सालेकसा तालुक्यात कृषी महाविद्यालयाची स्थापना व्हावी, ही मागणी पूर्ण झाल्यास तालुक्यातील शिक्षण, शेती, संशोधन आणि रोजगार क्षेत्राला निश्चितच नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा तालुक्यातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## शिरूर प्राथमिक शिक्षक पतसंस्थेकडून मिना म्हसे यांचा सन्मान



**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने महिला खो खो स्पर्धेत राज्यात दुसरा व गतवर्षी जिल्हा गुणवंत पुरस्कार मिळाल्याबद्दल साहित्यिक शिक्षिका मिना अशोक म्हसे यांचा सन्मान पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेचे राज्याध्यक्ष, राष्ट्रीय पुरस्कार विजेते अनिल पलांडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार पोपटराव गावडे, पंचायत समितीचे उपसभापती रामभाऊ सासवडे, सभापती संदीप थोरात, मानद सचिव विजय गोडसे आदी मान्यवर उपस्थित होते. शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच तळेगाव ढमढेरे येथील शिक्षक भवन येथे पार पडली.

## इतरांना आनंद वाटल्याने आपला आनंद वाढत जातो आणि मन समाधानी होते : कुंदन खोब्रागडे



**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

आनंद हा केवळ स्वत:पुरता मर्यादित न ठेवता तो इतरांसोबत वाटून घेतल्यास त्याची अनुभूती अधिक आनंददायी होते. आपल्या आनंदात इतरांना सहभागी करून घेतल्याने मनाला समाधान मिळते आणि नात्यांमध्ये आपुलकी निर्माण होते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेत आनंद वाटत राहावे, असे मार्गदर्शन कुंदन खोब्रागडे यांनी केले. संकल्प योगा केंद्र, इंदिरानगर, चंद्रपूर येथे केंद्राच्या प्रारंभापासून सातत्याने योगसाधना करणाऱ्या ज्येष्ठ योगसाधिका सुनंदा दौलत पंडिले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते मार्गदर्शन करत होते. यावेळी योगसाधकांच्या उपस्थितीत वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुंदन खोब्रागडे म्हणाले की, योग ही केवळ व्यायामाची पद्धत नसून शारीरिक व मानसिक आरोग्य संतुलित ठेवणारी जीवनशैली आहे.

एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे आणि आनंदाचे क्षण सामूहिकपणे साजरे करणे, ही निरोगी व आनंदी जीवनाची सुंदर वाट असल्याचे त्यांनी सांगितले." यानंतर मोरेश कुरेकर यांनी योगाचे महत्त्व विशद करताना नियमित योगसाधनेमुळे शरीराची लवचिकता, श्वसनक्षमता, मानसिक स्थैर्य आणि एकाग्रता सुधारण्यास मदत होते, असे सांगितले. योगाचा लाभ सातत्यपूर्ण सरावातून अधिक प्रभावीपणे मिळतो, त्यामुळे प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाला स्थान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. नानाजी चटकी व चिंतामण येवले यांनी संकल्प योगा केंद्राशी अधिकाधिक नागरिकांनी जोडले जावे, तसेच केंद्रातील योगसाधकांनी आपल्या परिचयातील नवीन व्यक्तींनाही योगसाधनेसाठी प्रोत्साहित करून केंद्राशी जोडावे, याबाबत मार्गदर्शन केले. योगकेंद्र हे केवळ योग शिकण्याचे ठिकाण नसून आरोग्य, सकारात्मक विचार आणि परस्पर आपुलकी वाढविणारे व्यासपीठ बनावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात अनिल मुन यांनी मधुमेह या आजाराबाबत मार्गदर्शन केले. मधुमेहाची कारणे, प्रतिबंध, आहार-विहाराचे महत्त्व तसेच नियमित व्यायाम व योगसाधनेचे आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम याबाबत त्यांनी उपस्थितांना माहिती दिली. जीवनशैलीत योग्य बदल करून आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदमा कुरेकर यांनी केले, तर अक्षय घुबडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमात संकल्प योगा केंद्रातील योगसाधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सौ. सुनंदा दौलत पंडिले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या कार्यक्रमातून स्वतःचा आनंद इतरांसोबत वाटा, आरोग्याची काळजी घ्या आणि योगाच्या माध्यमातून निरोगी जीवन जगा, असा सकारात्मक संदेश देण्यात आला.

# थाटात पार पडला बाबा जुमदेवजी यांचा सत्कार सोहळा

### भव्य पदयात्रेने वेधले लोकांचे लक्ष, नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन यांची उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**





येथील परमात्मा एक आनंदधाम येथे आज दिनांक २ सप्टेंबर ला व्यसनमुक्ती अभियान अंतर्गत भगवत कृपा षष्ठीच्या पूर्व प्रभात ला महानत्यागी बाबा जुमदेवजी यांचा सत्कार सोहळा मोठ्या थाटात पार पडला. दरम्यान सदर सोहळ्याला कार्यक्रमाचे अध्यक्ष ताराचंद भाजीपाले, नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन, नगरसेवक रजत गजभिए यांचेसह अनेक राजकिय मंडळी व हजारो सेवक सेविकांनी हजेरी लावली होती.

दरम्यान महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती गौरव पुरस्कृत (महाराष्ट्र शासन) २०१३ व २०१८ व तसेच रामटेकचे ब्रँड अँबेसिडर लक्ष्मणराव मेहर (बाबूजी) यांच्या मार्गदर्शनात शहरातील लंबे हनुमान मंदिर ते आनंदधाम पर्यंत भव्य पदयात्रा काढण्यात आली होती. पदयात्रेत विविध झाक्यांसह हजारो सेवक, सेविका, बालकलाकार सहभागी झालेले होते.

पदयात्रेत भजनांचा आवाज, पदयात्रेत सहभाग घेतलेल्यांचा ठिकठिकाणी सत्कार करण्यात येत होता. त्याचप्रमाणे काही नृत्यांगना नृत्याचे सादरीकरण करीत होते. या भव्य पदयात्रेने लोकांचे लक्ष वेधले होते. पदयात्रा परमात्मा एक आनंदधाम येथे पोहोचल्यावर तेथे स्टेज तयार करण्यात आलेला होता. दुपारी १२ वाजता दरम्यान पाहुण्यांच्या स्वागत सत्काराचा कार्यक्रम पार पडला. यात नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन, नंदकिशोर तांडेकर, मोहन देशमुख, दिलीप, प्रतापराव दमाहे, नगरसेवक रजत गजभिए यांचा स्वागत सत्कार करण्यात आला.

दरम्यान स्टेज वर नृत्यांगनांचे नृत्य झाले. कार्यक्रमादरम्यान अनेक राजकीयांची भाषणे झाली. यात नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन, आनंद मेहेर, बजरंग मेहर, ताराचंद भाजीपाले, नगरसेवक रजत गजभिये यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन यांनी 'व्यसन दुर करण्याचं काम बाबा जुमदेवजी यांनी केलेले आहे. तसेच समाज जागृती खुप कठीण काम असुन मेहर बाबूजी यांनी त्याचा योग्य रितीने प्रचार प्रसार केलेला असल्याचे 'सांगत मेहर बाबजी यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. नगरसेवक रजत गजभिये यांनी पदयात्रेबद्दल सांगताना' ही पहिली पदयात्रा असेल की जी एवढ्या भव्य स्वरूपात निघालेली होती' असे सांगितले.

कार्यक्रमादरम्यान श्रीनिका रोहीत माकडे या दुर्धर आजाराने ग्रस्त मुलीला आर्थिक मदत करण्यासाठी नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन तथा लक्ष्मणराव मेहर (बाबूजी) यांनी उपस्थितांना आवाहन केले. दरम्यान यात हजारो रुपयांचा निधी गोळा झालेला होता. कार्यक्रमात पाणीव्यवस्था जितेंद्र वलोकर यांनी केलेली होती. प्रास्ताविक अर्चना अनकर यांनी तर संचालन सीमा यांनी व आभार प्रदर्शन रश्मी यांनी केलेले होते.

थोडक्यात

## इनरव्हील क्लब ऑफ नागपूरच्या उपक्रमातून बालवाडीतील चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनरव्हील क्लब ऑफ नागपूरच्या अध्यक्षा पूजा सावजी यांच्या नेतृत्वाखाली शारदा बालमंदिर बालवाडी येथे एक सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत बालवाडीतील १५ चिमुकल्यांना शैक्षणिक व दैनंदिन उपयोगाच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले. प्रत्येक मुलाला स्कूल बॅग, टिफिन बॉक्स, पाण्याची बाटली आणि चेंडू देण्यात आला. तसेच मुलांसाठी राजगिरा लाडू, चिक्की आणि बिस्किटांचे पाकीट यांचेही वाटप करण्यात आले. हा संपूर्ण उपक्रम क्लब प्रतिभा कुलकर्णी यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आला. क्लबच्या चार सदस्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

भेटवस्तू मिळाल्याने चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. त्यांच्या निरागस हास्याने संपूर्ण वातावरण आनंदमय झाले. बालकांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणे, या उद्देशाने राबविण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत हृदयस्पर्शी ठरला.

## शिरूर प्राथमिक शिक्षक पतसंस्थेकडून सचिन बेंडभर यांचा सन्मान

### चौथीच्या पाठ्यपुस्तकातील बचत कथेची विशेष दखल




**दै. सिंहवाणी वृत्त, पुणे**

जून २०२६ पासून बालभारती इयत्ता चौथीच्या पाठ्यपुस्तकात बचत या कथेचा समावेश झाल्याबद्दल शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर यांचा सन्मान पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेचे राज्याध्यक्ष, राष्ट्रीय पुरस्कार विजेते अनिल पलांडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार पोपटराव गावडे, पंचायत समितीचे उपसभापती रामभाऊ सासवडे, सभापती संदीप थोरात, मानद सचिव विजय गोडसे आदी मान्यवर उपस्थित होते. शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच तळेगाव ढमढेरे येथील शिक्षक भवन येथे पार पडली. यावेळी प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर यांच्या बचत या कथेचा इयत्ता चौथीच्या पाठ्यपुस्तकात समावेश झाल्याबद्दल पतसंस्थेच्या तीने शिरूर पंचायत समितीचे उपसभापती रामराव सासवडे, पंचायत समिती सदस्य विजय रणसिंग, विद्या पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेचे राज्याध्यक्ष व राष्ट्रीय पुरस्कार विजेते अनिल पलांडे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी पतसंस्थेचे सभापती संदीप थोरात, उपसभापती पोपट गांधले, सचिव विजय गोडसे, प्रभाकर शेळके, चंद्रकांत खैरे, रामचंद्र नवले, संतोष विधाटे, अनिल शेळके, एकनाथ जगदाळे, बिबीशन गांजे, विश्वास साकोरे, शरद झेंडे, संतोष थोपटे, अविनाश चव्हाण, अंजली शिंदे, कविता जवळकर, मानसी थोरात, शर्मिला निचित उपस्थित होत्या. यावेळी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी मार्गदर्शक शिक्षक सेवानिवृत्त शिक्षक यांचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोपट इंगवले यांनी केले आभार रामचंद्र नवले यांनी मानले.

## इनरव्हील क्लब ऑफ नागपूरचा सायकल वाटपातून मुलींच्या स्वावलंबनाचा उपक्रम




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

इनरव्हील क्लब ऑफ नागपूरच्या अध्यक्षा पूजा साओजी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा अध्यक्षा मनिषा चौधरी यांच्या अधिकृत भेटीच्या निमित्ताने सायकल वाटप उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत सोमलवार स्कूलची गुणवंत विद्यार्थिनी सिद्धी गडपायले हिला तिच्या दैनंदिन प्रवासासाठी व शिक्षणासाठी एक सायकल प्रदान करण्यात आली. तसेच मातृशक्ती कल्याण केंद्रातील पाच गरजू मुलींना सायकली देण्यात आल्या. या सायकलींमुळे मुलींना शिक्षणासाठी ये-जा करण्यासाठी सोयीचे आणि स्वतंत्र साधन उपलब्ध झाले.

सर्व सहा सायकलींचे प्रायोजकत्व क्लबच्या माजी अध्यक्षा डॉ. विजया खंजोडे यांनी केले. या प्रकल्पासाठी एकूण २४,००० खर्च करण्यात आला. क्लबच्या १४ सदस्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. हा उपक्रम केवळ सायकल वाटपापुरता मर्यादित नसून, मुलींमध्ये शिक्षणाची ओढ, गतिशीलता, आत्मविश्वास आणि स्वावलंबन निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आला. सायकलच्या माध्यमातून त्यांच्या प्रवासातील अडचणी कमी होऊन शिक्षणाच्या संधी अधिक सुलभ व्हाव्यात, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. मुलींच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि आत्मविश्वास हा या उपक्रमाच्या यशाचे खरे प्रतीक ठरला.

# वाढत्या महागाईविरोधात राष्ट्रवादी आक्रमक

**वृत्तसंस्था, मुंबई**

वाढत्या महागाईच्या मुद्यावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसरात आंदोलन करत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. या आंदोलनात खासदार सुप्रिया सुळे सहभागी झाल्या.

सीएसएमटी परिसरात झालेल्या आंदोलनात पक्षाचे मुंबईतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यकर्त्यांनी 'महागाई की मार नहीं चलेगी' अशा घोषणा देत सरकारचा निषेध केला. आंदोलनात काही कार्यकर्त्यांनी भाज्या आणि धान्यांचे हार गळ्यात घालून वाढत्या महागाईकडे लक्ष वेधले.

महागाईवर बोलताना सुप्रिया सुळे यांनी सरकारी आकडेवारी आणि प्रत्यक्ष घरगुती खर्चातील फरकावर प्रश्न उपस्थित केला.



फूड इन्फ्लेशन किती आहे, हा प्रश्नच आहे. तुम्ही घरी जाऊन तुमच्या आई, बहीण किंवा पत्नीला विचारा, किती महागाई झाली आहे. घरातील खर्च कसा भागवायचा, हा प्रश्न आज प्रत्येक कुटुंबासमोर आहे, असे सुळे म्हणाल्या. त्यांनी दूध, धान्य, भाज्या, कांदा, साखर यांसारख्या वस्तूंच्या किमतींचा उल्लेख करत सामान्य नागरिकांच्या अडचणींकडे सरकारचे लक्ष वेधले.

सकाळच्या नाश्त्यापासून ते घरातील रोजच्या स्वयंपाकापर्यंत महागाईचा परिणाम जाणवत असल्याचा दावा त्यांनी केला. दूध हा मूलभूत पदार्थ आहे. सकाळची सुरुवातच दुधापासून होते. मात्र, त्याचे दरही वाढले आहेत. सामान्य माणसाचे कंबरडे मोडण्याचे काम सरकार करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

**आनंदाचा शिधाही गायब**

राज्य सरकारच्या आनंदाचा शिधा योजनेचा उल्लेख करत सुळे यांनी सरकारवर टीका केली. निवडणुकीच्या काळात अनेक योजना आणि सवलतींची चर्चा होते; मात्र निवडणूक संपल्यानंतर त्यांची अंमलबजावणी किंवा सातत्य कुठे दिसते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**निवडणुकांपुरत्या योजना**

त्यांनी लाडकी बहीण योजनेचाही उल्लेख केला. निवडणुकीनंतर मोठ्या संख्येने महिलांची नावे योजनेतून कमी करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. या महिलांना आता आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्या म्हणाल्या.

**शेतकऱ्यांना कर्जमाफीचा न्याय मिळाला का?**

महागाईचा प्रश्न केवळ शहरातील कुटुंबांपुरता मर्यादित नसून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांवरही त्याचा परिणाम होत असल्याचे सुळे यांनी सांगितले. शेतकरी कर्जबाजारी होत आहेत आणि आत्महत्यांसारख्या गंभीर घटना घडत आहेत. सरकारने कर्जमाफीचा मोठा गाजावाजा केला, मात्र प्रत्यक्षात अन्नधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्याला किती न्याय मिळाला, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**मतदार यादीच्या मुद्यावरही सरकारला सवाल**

आंदोलनादरम्यान सुप्रिया सुळे यांनी मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाच्या प्रक्रियेचाही मुद्दा उपस्थित केला. लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदारांच्या नावांबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचा संदर्भ देत त्यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले. आपल्या मतदारसंघात सुरू असलेल्या एसआयआर प्रक्रियेवर आपण स्वतः दररोज लक्ष ठेवत असल्याचे सुळे यांनी सांगितले.

**सोन्याच्या खरेदीवरून मोदींचा गोंधळात टाकणारा संदेश**

सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारच्या अर्थव्यवस्थे बाबतच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थव्यवस्थेतील वाढीबाबत सकारात्मक चित्र मांडले असताना दुसरीकडे सोन्याच्या खरेदीबाबत नागरिकांना वेगळा संदेश दिला जात असल्याचे त्यांनी म्हटले. देशाची अर्थव्यवस्था चांगली चालली असल्याचे सांगितले जात असेल, तर सोन्याच्या खरेदीबाबत वेगळी भूमिका का घेतली जाते, असा सवाल करत त्यांनी केंद्र सरकारकडून गोंधळात टाकणारे संकेत दिले जात असल्याची टीका केली.

**महागाई कमी होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार**

सीएसएमटी परिसरातील आंदोलनातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने महागाईचा मुद्दा पुन्हा आक्रमकपणे पुढे आणला आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमती, शेतक-यांची आर्थिक परिस्थिती, महिलांवरील आर्थिक भार आणि सरकारी योजनांबाबतचे प्रश्न या मुद्यांना पक्षाने आंदोलनाच्या केंद्रस्थानी ठेवले. महागाई कमी करण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली नाहीत, तर आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा सुप्रिया सुळे यांनी दिला.

## थायलंडने भारतीयांची व्हिसा मर्यादा घटवली

**बँकॉक :** थायलंड सरकारने भारतीयांसह ६० देश आणि प्रदेशांतील नागरिकांसाठी असलेली व्हिसामुक्त मुक्कामाची मर्यादा कमी केली आहे. आता भारतीय पासपोर्टधारकांना थायलंडमध्ये व्हिसाशिवाय ३० दिवसांपर्यंतच राहता येणार आहे. यापूर्वी ही मर्यादा ६० दिवस होती. थायलंडच्या गृह मंत्रालयाने या संदर्भातील नवीन अधिसूचना ३१ ऑगस्ट रोजी रॉयल गॅझेटमध्ये प्रसिद्ध केली. त्याबद्दल सविस्तर वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. नव्या नियमामुळे भारतीय पर्यटकांसाठी थायलंडचा व्हिसामुक्त प्रवेश मात्र कायम राहणार आहे. म्हणजेच केवळ पर्यटनाच्या उद्देशाने थायलंडला जाणाऱ्या भारतीय नागरिकांना प्रवासापूर्वी व्हिसासाठी अर्ज करण्याची आवश्यकता नाही. मात्र, देशात प्रवेश केल्यानंतर परवानगी असलेला मुक्काम आता जास्तीत जास्त ३० दिवसांचा असेल. यापूर्वी भारतीय पर्यटकांना व्हिसाशिवाय ६० दिवसांपर्यंत थायलंडमध्ये राहण्याची परवानगी होती.



थायलंडने जुलै २०२४ मध्ये व्हिसामुक्त प्रवेशाची सुविधा मोठ्या प्रमाणावर वाढवली होती. त्यावेळी ९३ देश आणि प्रदेशांतील नागरिकांना ६० दिवसांपर्यंत व्हिसाशिवाय थायलंडमध्ये राहण्याची परवानगी देण्यात आली होती. भारताचाही या यादीत समावेश करण्यात आला होता. पर्यटनासोबत काही व्यावसायिक कामकाज आणि काही तातडीच्या कामांसाठीही या व्यवस्थेचा वापर करता येत होता. परिस्थितीनुसार आणखी ३० दिवसांची मुदतवाढ देण्याचा अधिकार स्थलांतर अधिकाऱ्यांकडे होता.

## काँग्रेसच महिला आरक्षणाची खरी जनक

**वृत्तसंस्था, मुंबई**

काँग्रेसने महिला आरक्षण विधेयकाला कधीही विरोध केलेला नाही, उलट काँग्रेसच महिला आरक्षणाची खरी जनक आहे, असा जोरदार पलटवार महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नाशिक दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भाजप महिला मोर्चाने केलेल्या आंदोलनावर प्रत्युत्तर देताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, काँग्रेसने कधीही विरोध केला नाहीः काँग्रेसचा महिला आरक्षणाला विरोध आहे, हे कोणत्या मूखार्ने सांगितले? २०२३ मध्ये जेव्हा केंद्र सरकारने घटनादुरुस्ती विधेयक आणले, तेव्हा काँग्रेसने त्याला पूर्ण पाठिंबा दिला होता. महिला आरक्षणाचे मूळ जनक आम्हीच आहोत.



भाजपला महिला आरक्षण लागू करायचे नसून केवळ उत्तर-दक्षिण वाद निर्माण करायचा आहे आणि जनगणनेच्या नावाखाली टोलवाटोलवी करायची आहे. महिलांच्या अधिकारांवर बोलणाऱ्यांनी आधी सांगावे की राष्ट्रीय स्वयंसेवक संघात एखाद्या महिलेला प्रवेश मिळतो का? संघात एखादी महिला कधी सरसंघचालक होऊ शकते का? मनुस्मृती मानणाऱ्यांनी आम्हाला महिलांचे हक्क शिकवू नयेत.

**प्रत्येक पेपरफुटीमागे भाजपच्या बड्या नेत्यांचा हात**

एमपीएससी औषध निरीक्षक परीक्षेतील गैरप्रकार आणि राज्यातील सातत्यपूर्ण पेपरफुटीवर चव्हाण यांनी तीव्र संताप व्यक्त केला. दोन-दोन कोटींना पेपर विक्री : ह्य कॉलेज प्रवेश असो वा सरकारी नोकऱ्या, राज्यात प्रत्येक पेपर फुटत आहे. या पेपरफुटीच्या गोरखधंद्याला भाजपचे ज्येष्ठ नेते जबाबदार आहेत. पेपरफुटीमध्ये कोणतीही मोठी जोखीम राहिलेली नाही; कारण कोणालाही कडक शिक्षा होत नाही, मात्र बक्षीस प्रचंड मिळते. दोन-दोन कोटी रुपयांना एक-एक पेपर विकला जात आहे. भाजपच्या कार्यकाळात १५० हून अधिक परीक्षांचे पेपर फुटले, पण एकाही मोठ्या सूत्रधाराला शिक्षा झालेली नाही. गरीब विद्यार्थ्यांचे हे शोषण आम्ही खपवून घेणार नाही. सरकारने या प्रकरणाची पाळेमुळे खणून काढून संबंधितांना कठोर शिक्षा केली पाहिजे.

**कुंभमेळा, शक्तिपीठ महामार्गात ४० टक्के कमिशनचा आरोप**

नाशिकच्या पायाभूत सुविधा आणि विकासकामांवर बोलताना त्यांनी सरकारवर थेट भ्रष्टाचाराचे ताशेरे ओढले. नाशिक खड्ड्यांचे शहर झाले आहे. नाशिक कुंभमेळ्याचा कोणताही सविस्तर प्रकल्प अहवाल अद्याप तयार नाही. स्थानिकांना आणि जनतेला विश्वासात न घेता केवळ ठराविक ठेकेदारांना खिरापत वाटण्याचे काम सुरू आहे. कुंभमेळ्याच्या कामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू आहे. १ लाख कोटी रुपयांचा शक्तिपीठ महामार्ग हा केवळ ४० टक्के कमिशन लाटण्यासाठी रेटला जात आहे.

## बाघमायनरच्या कामावर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा बोलबाला

### स्थानिक मजुरांना कामापासून ठेवले वंचित, रोजगार सेवकासह प्रशासनाचा अजब कारभार



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

बाघसिंचाई व्यवस्थापन कार्यालय गोंदिया उपविभाग कार्यालय आमगाव मार्फत सालेकसा बागसिंचाई व्यवस्थापन कार्यालय अंतर्गत सालेकसा तालुक्यातील बोदलबोडी ग्रामपंचायत मार्फत मौजा भाडीपार या गावी मागील अनेक वर्षापासून सालेकसा बाघ सिंचाई कार्यालयातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा वृक्ष लागवडच्या कामावर अधिक बोलबाला आहे, असा आरोप स्थानिक नागरिकांनी व मजुरांनी लावला आहे. विशेष म्हणजे शासन एकीकडे म्हणतो की स्थानिक मजुरांना गावातच काम मिळावे, या हेतूने बरेच मजदूर गावातील स्थानिकांना काम न मिळाल्यामुळे त्यांच्या सुद्धा उपासमारीची पाळी आली असून ते सध्या इतरही ठिकाणी रोजगाराच्या शोधात पलायन करत आहेत.

प्राप्त माहितीनुसार सेवानिवृत्त कर्मचारी व रोजंदारीवर काम करीत असून ते प्रत्यक्षात कधीच कामावर व गावात वृक्ष लागवड त्या ठिकाणी दिसले नाही त्यांची हजेरी सुद्धा लावली जात असून शासनाची दिशाभूल करीत आहेत. यामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या व रोजगार सेवकांचा आशीर्वाद असेल असा अंदाजही लावला जात आहे. प्राप्त माहितीनुसार सदर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शनही मिळते परंतु रोजगार सेवक व काही अधिकारी आपल्या कमिशनच्या लालसेपोटी मर्जीतल्या लोकांना वृक्ष लागवडीकरिता घेतले आहे. सदर हे व्यक्ती बाहेर गावातील असून स्थानिकांना डावलून इतर गावच्या मजुरांना कामावर घेतले जात आहे. यामध्ये स्थानिक रोजगार सेवकांचाही आशीर्वाद असून साठे लोटे होत असल्याची चर्चा सध्या जोमात सुरू असल्याचे आरोप भाडीपारं येथील ग्रामस्थांनी केला आहे.

विशेष बाब म्हणजे बाघनहरावरील वृक्ष लागवडीकरिता जे मजूर बाहेरून आहेत त्यांना कायमस्वरूपी बंद करण्यात यावे व शासनाची दिशाभूल करणाऱ्यांवर कारवाई करून गावातील स्थानिक मजुरांना त्यांच्या हाताला काम देण्यात यावे असे मागणीचे पत्र ग्रामपंचायत सदस्य पुरुषोत्तम फुंडे, नंदलाल फुंडे, सोमा गेडाम, राजकुमार हरिणखेडे, हूपेश योगराज पटले, मोतीलाल हरीणखेडे, प्रेमलाल हरीणखेडे यांच्यासह ग्रामस्थांनी निवेदन बाघ सिंचन व्यवस्थापन कार्यालय सालेकसा येथे लेखी तक्रार केली आहे.

# एन्ट्रीमुळे रस्ते बनले वाहनतळ! वाहतूक पोलीस कायद्याची अंमलबजावणी न करता एन्ट्री वसुलीत मग्न

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

शहरातील मुख्य रस्त्यावर जिकडे पाहाल तिकडे वाहने उभी ठेवल्या जात असुन बेकायदा वाहानतळ निर्माण करुण दळणवळणास अडथळा निर्माण होत असुन वाहन चालक मालकांचा 'पोलिसांना महिना देतो' असा टाहो असल्याने सदर गंभीर विषयाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करावी अशी मागणी जोर धरु लाली आहे.

कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या सावनेर पोलिसांच्या कार्यपद्धतीवरच आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे. शहरातील अवैध प्रवासी वाहानतळ व वाहतुकीला आळा घालण्याऐवजी वाहन चालकांकडून कथित





'महिन्याची एन्ट्री' घेतली जात असल्याचे आरोप पुढे येत असून, या संपूर्ण प्रकाराची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी होत आहे.

सावनेर शहरात प्रवासी ऑटो, ट्रॅक्स जीप व खासगी प्रवासी वाहनांकडून रस्त्यावरच प्रवासी भरले जात असल्याने वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. विशेष म्हणजे, पोलिसांना महिना देतो असे वाहनचालकांकडून उघडपणे सांगितले जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. या दाव्याची सत्यता तपासण्यासाठी संबंधित वाहनचालक,वाहतूक पोलीस कर्मचारी आणि कथित आर्थिक व्यवहारांची चौकशी होणे गरजेचे आहे.सूत्रांच्या माहितीनुसार शहरात सुमारे २५० ऑटो, ६० ट्रॅक्स जीप असून त्यांच्या नावाने अनुक्रमे २०० व ५०० रुपयांची कथित 'एन्ट्री' घेतली जाते. एम.पी. ट्रॅव्हल्सच्या एका वाहनाकडून महिन्याला १० हजार रुपये घेतले जात असल्याचाही आरोप आहे. या सर्व व्यवहारातून पोलिसांची सुमारे २.५० लाख रुपयांची कथित कमाई होत असल्याचा दावा करण्यात येत असुन यापेक्षा मोठी एन्ट्री जवळच्या कन्हान नदितून रेतीचे परिवहन करणाऱ्या ट्रक व टॅंक्टर कडून केल्या जात असल्याऊ सुत्र आहे. शहरातील गडकरी चौक, खापा रोड चौक, बसस्थानक परिसर तसेच तहसील कार्यालय परिसरात रस्त्यावरच प्रवासी वाहने उभी करून प्रवासी भरले जात असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे.

**सावनेर पोलिसांवर गंभीर आरोप !**

शहरातील सीसीटीव्ही यंत्रणा, रस्त्यावरील अतिक्रमणे, मोठ्या वाहनांची शहरातून होणारी वाहतूक आणि वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीवरही प्रश्न उपस्थित होत वाहनचालकांकडून खरोखरच 'महिन्याची एन्ट्री' घेतली जाते का? पैसे नेमके कोणाकडे जातात? तक्रारीनंतरही कारवाई का होत नाही? या प्रश्नांची उत्तरे आता सावनेर पोलिसांनी नव्हे, तर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी चौकशी करून जनतेसमोर ठेवण्याची गरज आहे.'महिना' घेऊन नियमांना माफी मिळत असेल, तर सावनेरमध्ये कायदा नेमका कोणासाठी? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.